नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत मराठी अभ्यास परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या भाषा आणि जीवन ह्या नियतकालिकाच्या (त्रैमासिक) अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून मराठी अभ्यास परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठी अभ्यास परिषद पत्रिका

भाषा आणि जीवन

वर्ष २२ : अंक ४, दिवाळी २००४



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

संपादकीय

मराठीच्या विकासाच्या वाटा

१ मराठी वृत्तसंस्था

मराठीच्या विकासाला वृत्तपत्रांचा मोठा हातभार लागला आहे. किंबहुना मराठी गद्याची घडण लोकहितवादी, चिपळूणकर, टिळक, आगरकर, शि. म. परांजपे, कोल्हटकर, न. चिं. केळकर, ग. त्र्यं. माडखोलकर इत्यादी संपादकांच्या वृत्तपत्रीय लेखनामुळे झाली असे म्हणायला हरकत नाही. नंतरच्या काळातही अत्रे, पाध्ये, महाजनी, तळवलकर यांचा प्रभाव जाणवतो. परंतु चित्रवाणीच्या घराघरातील प्रवेशानंतर आणि नंतरच्या तिच्या विस्तारानंतर वृत्तपत्रांचे वाचन बातम्या, मनोरंजन, क्रीडा' इत्यादी विषयांबद्दलचे लेखन व विविध पुरवण्या यांच्यापुरते मर्यादित होत गेले. त्यामुळे संपादकीय लेखनाचा भाषेवरील प्रभाव कमी झाला आहे. बातम्या व तत्सम इतर लेखनातील भाषेचा दर्जा समाधानकारक नसतो. वृत्तपत्रांना त्या प्रकारचा बराच मजकूर इंग्रजीवरून भाषांतरित करून घ्यावा लागतो आणि तसे करताना घड्याळाशी स्पर्धा करावी लागत असल्यामुळे त्यात अनेक त्रुटी राहून जातात. विशेषण व नाम, कर्ता व क्रियापद अशा जोड्यांमध्ये विसंवाद निर्माण होतो, पारिभाषिक संज्ञांमध्ये चुका होतात, वाक्ये अपूर्ण राहतात, ती गुंतागुंतीची व बेंगरूळ होतात. या चुका वाचकांनी दाखवून दिल्या तरी चुका घडून गेलेल्या असतात; त्यात सुधारणा करणे शक्य नसते. त्यामुळे पत्रकार निर्ढावत व वाचक बेफिकीर होत जातात.

वृत्तपत्रीय मराठीत सुधारणा घडवून आणायची असेल तर मराठी वृत्तसंस्था निर्माण होणे आवश्यक आहे. इंग्रजी, मराठी व हिंदी या भाषांचे चांगले ज्ञान असणाऱ्या, चांगले मराठी लिहिता येणाऱ्या, भाषांतरातील समस्या व त्यावरील उपाय यांचा अभ्यास केलेल्या व्यक्तींना आकर्षक मोबदला देऊन नेमणे अशा वृत्तसंस्थेला शक्य होईल. वेगवेगळ्या विषयातील तज्ज्ञांची तालिका तयार करून त्यांचा सल्ला नियमितपणे मिळविणेही अशा संस्थेला शक्य होईल. त्यामुळे अशा वृत्तसंस्थेची सेवा घेणे वृत्तपत्रांना काटकसरीचे व फायद्याचे ठरेल. पारिभाषिक संज्ञांपासून ते वाक्यरचनेपर्यंत एकरुपता राखली गेल्यामुळे मराठीच्या सर्वसाधारण

अनुक्रमणिका

वापराचा दर्जा उंचावण्यास ही संस्था मोठा हातभार लावू शकेल.

राज्यमराठी विकास संस्थेने किंवा राज्यशासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाने यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. पी. टी. आय. व यु. एन. आय. या वृत्तसंस्थांची इंग्रजी (व शक्य असल्यास हिंदीही) सेवा घ्यायची व त्यांचे मराठी भाषांतर करून ती सेवा मराठी वृत्तपत्रांना पुरवायची असे या संस्थेचे मुख्य कार्य असेल. यासाठी पी. टी. आय., यु. एन. आय. या वृत्तसंस्थांशी करारमदार करावे लागतील; मुंबई, नागपूर, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, रत्नागिरी इत्यादी प्रमुख शहरात वितरण व्यवस्था करावी लागेल; भाषांतराचे काम करणारे मध्यवर्ती कार्यालय उभारावे लागेल. साहजिकच, एखाद्या खाजगी संस्थेला या सर्व गोष्टी करणे कठीण ठरेल. शासनाने किंवा बहुसंख्य मराठी वृत्तपत्रांनी एकत्र येऊन पुढाकार घेतला तरच अशी वृत्तसंस्था उभी करणे शक्य होईल.

नजीकच्या भविष्यकाळात अशी संस्था निर्माण होणे शक्य नाही, हे उघड आहे. पण तिच्याबद्दलची निदान कल्पना मांडणे हे त्या दिशेने टाकलेले एक पाऊल ठरू शकेल.

■

प्र. ना. परांजपे

शुद्धलेखनांतील अराजक : परिणाम आणि उपाय

आपण वाचायला शिकतो ते पूर्वी जे लिहिलेले, छापलेले साहित्य आहे ते समजून घेण्यासाठीही शिकत असतो, हे दैनिक वृत्तपत्रांच्या उपलब्धतेनंतर आपण विसरून चाललो आहोत. मुद्रित वाङ्मयात रोज इतकी भर पडत आहे की, सर्वसामान्य वाचक जुनी पुस्तके हातांत मुळीच धरीनासा झाला आहे. त्याच्या आयुष्यांत जुन्या ग्रंथांचे प्रयोजनच उरले नाही. छापलेल्या पुस्तकांतून वाचकाला कोठल्याही काळात सहजगत्या प्रवेश करता आला पाहिजे - आपल्या भाषेच्या लेखनाचे नियम त्यासाठी अनुकूल असले पाहिजेत याचे भान नवीन नियम करणाऱ्यांना राहिलेले नाही. जे लोक उच्चाराप्रमाणे लेखन पाहिजे असे म्हणतात त्यांना लिखित भाषेला देशकाल ओलांडून जाऊन आपला आशय निःसंदिग्धपणे वाचकापर्यंत पोहोचवावयाचा आहे याची जाणीव नाही असे म्हणणे भाग आहे.

■

दिवाकर पुरुषोत्तम मोहनी, "आजचा सुधारक", १५.५

नमः शान्ताय तेजसे ।

सरोजा भाटे

गेल्या ९ फेब्रुवारीला भागवत गुरुजींचे दुःखद निधन झाले आणि सरस्वतीच्या गाभाऱ्यात तेवणारा एक नंदादीप शांत झाला. गुरुजींच्या जाण्याने महाराष्ट्रातली तीनशेहून अधिक वर्षांची प्राच्य विद्याध्ययनाची परंपरा खंडित झाली आहे.

गुरुजींचा जन्म २४ जानेवारी १९१८ सालचा. चाफळ या जन्मगावी मराठी सातवीपर्यंत शिकल्यानंतर वामन बाळकृष्ण भागवत यांनी पाठशाळेची वाट धरली. इचलकरंजीचे पं. लक्ष्मणशास्त्री मुरगुडकर, काशीचे पं. गणपतीशास्त्री हेब्बार, वाईचे पूज्य केवलानंद सरस्वती यांसारख्या गुरुंकडे त्यांनी व्याकरण, मीमांसा, वेदांत इत्यादी दर्शनांचे धडे घेतले. आपल्या पाठशालेय दिनक्रमात आपण पाठांतरावर भर देऊन वेळ कसा सत्कारणी लावला हे त्यांनी त्यांच्या उत्तरायुष्यात एकदा आम्हाला सांगितले. सांगलीला पाठशाळेत १४व्या वर्षी शिकत असताना त्यांनी 'अष्टाध्यायी जगन्माता अमरकोशो जगत्पिता' असं गुरुजींच्याकडून ऐकलं आणि दिवसाचे सहा सहा तास घोकंपट्टी करून सहा महिन्यांत अमरकोशाच्या ३००० ओळी कंठस्थ केल्या. नदीवर स्नानाला जाताना पाऊणतास चालावे लागे. यावेळी अष्टाध्यायीची संथा जातायेता घालीत सहा महिन्यांत अष्टाध्यायी कंठस्थ केली. मिरजेला गेल्यावर वर्तमानपत्रात गीतापाठांतर स्पर्धेचे निवेदन वाचले आणि सहा महिन्यांत गीता पाठ करून ते स्पर्धेत उतरले. परीक्षकांनी आधीच बजावले, पाठ म्हणताना एक चूक झाली तर एक रुपया कमी होईल. प्रत्यक्षात त्यांनी सगळी गीता अस्खलित म्हणून दाखवल्यावर परीक्षक म्हणाले, "इतकी न अडखळता गीता म्हणणारा पहिला तूच" आणि खूष होऊन त्यांनी बक्षीसाचे दहाच्या दहा रुपये तर दिलेच, शिवाय शेरभर पेढेही दिले. 'अमरकोश', 'अष्टाध्यायी' आणि नंतर 'कुवलयानंद'ही त्यांनी पाठ केला. हे तीन ग्रंथ म्हणजे त्यांचे बालमित्र. त्यांच्याशी त्यांची शेवटपर्यंत घट्ट मैत्री होती. ५-६ वर्षांपूर्वी एकदा ते म्हणाले होते, "आताशा हात थरथरतात; लिहिता येत नाही मग बसल्याबसल्या पुन्हा अष्टाध्यायी आणि

अमरकोशाची आवृत्ती करू लागलोय."

बडोदा, काशी, पुणे इथल्या व्याकरणरत्न, व्याकरणचूडामणि, व्याकरणपारंगत अशा परीक्षा क्रमाक्रमाने उत्तीर्ण होऊन वामन भागवत संस्कृत व्याकरणाच्या पंडिती परंपरेत स्थिरावले आणि पंचविशीत अध्यापनाला सुरुवात करून ते भागवत गुरुजी झाले. १९४७ साली त्यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रमुख-पदाची सूत्रे हाती घेतली आणि संस्कृतचा सर्वदूर प्रचार करण्याचे आपले स्वप्न खरे करण्यासाठी प्रसार परीक्षा सुरू केल्या. या परीक्षांना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्रतिसाद मिळू लागला. ज्या भुतांच्या वाड्याबाहेर पूर्वी गुलाल खोबरे ठेवले जायचे (आणि ते स्वच्छ धुवून गुरुजी सगळ्यांना खाऊ घालायचे) त्या भुताच्या वाड्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठ विद्यार्थ्यांनी गजबजू लागले. टि. म. वि. च्या संस्कृत परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र हा शैक्षणिक गुणवत्तेचा मानदंड बनला. गुरुजी बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयाचे प्राचार्य झाले आणि भुतांच्या वाड्यात तरुणाईचा वावर सुरू झाला. संस्कृतच्या प्रचारासाठी संस्कृतमधून वक्तृत्व, काव्यगायन, नाट्य अशा विविध स्पर्धांचे आयोजन आणि संस्कृत शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी वासंतिक वर्गांचे (समर स्कूल) आयोजन करून गुरुजींनी संस्कृत विद्येच्या विस्ताराची क्षितिजे आणखी रुंद केली. त्यांनी सुरू केलेल्या या सर्व योजना आजही, टिळक महाराष्ट्र अभिमंत विद्यापीठात कार्यान्वित आहेत.

गुरुजी म्हणजे अध्यापनाचा मूर्तिमंत वस्तुपाठ. त्यांच्याकडे शिकणाऱ्यांना शिकवावे कसे याचाही धडा मिळे. सर्वशुक्ला सरस्वतीची आठवण करून देणारं त्यांचं शुभ्र वेषातील वावरणं, ताठ बसणं, विद्यार्थ्यांना ऐकू जाईल इतपतच मोठ्या आवाजात विलंबित लयीत बोलणं, प्रत्येक शब्दाचा अर्थ आणि अन्वयार्थ स्पष्ट करून अगदी बिनडोक विद्यार्थ्याच्या गळी उतरवेपर्यंत विषय मांडत रहाणं, मधूनच "तू सांग बघू" म्हणून समोरच्या विद्यार्थ्याला दक्ष ठेवीत त्याची 'उपस्थिती' बळकट करणं आणि अधूनमधून गोष्टी, किस्से, सुभाषिते यांची पेरणी करून भाषाशास्त्राच्या रुक्ष जंगलातही विद्यार्थ्यांना मौजेची सहल घडविणं हे सगळं ज्या भाग्यवंतांनी अनुभवलं त्यापैकी काही उत्तम अध्यापक म्हणूनही घडले. जराही आचार्यमुष्टी न ठेवता गुरुजींनी सगळ्यांना भरभरून दिले. पाङ्क्त ज्ञानच नव्हे, जगण्याचं तत्त्वज्ञानसुद्धा. राष्ट्रीय पातळीवरच्या संस्कृत वक्तृत्व स्पर्धांसाठीही ते विद्यार्थ्यांना घेऊन जात आणि सुवर्णपदक पटकावणाऱ्या त्यांच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणखी बळावत जाई. गुरुजी नावाच्या या पाठशाळेची दारं अगदी पहाटेपासून

रात्री उशिरापर्यंत उघडी असत आणि उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्याला त्यांच्याकडे मुक्कामाचे भाग्यही मिळे. गुरुजींचे विद्यार्थ्यांवर अनंत उपकार आहेत. मात्र ते नेहमीच विद्यार्थ्यांचे ऋण मानीत; "तुमच्यामुळे मी शिक्षक झालो" असे म्हणत.

भागवत गुरुजी जसे खंदे शिक्षक होते तसेच सिद्धहस्त संशोधकही होते. पाणिनीय व्याकरणपरंपरेतल्या काही महत्त्वाच्या ग्रंथांचे मराठी अनुवाद आणि टिप्पणीसह त्यांनी केलेले संपादन हा भाषाशास्त्राच्या अभ्यासकांचा मोलाचा ठेवा आहे. भर्तृहरीच्या वाक्यपदीयाच्या ब्रह्मकांडाचे आणि त्यावरच्या स्वोपज्ञटीकेचं टिप्पणीसहित मराठी भाषांतर करून भर्तृहरीकडे जायची दुर्गम वाट त्यांनी सोपी केली. नागेशभट्टाचा 'परमलघुमंजुषा' हाही व्याकरणातल्या विषयांची तात्त्विक चर्चा करणारा क्लिष्ट ग्रंथ. गुरुजींनी त्याचे मराठी भाषांतर आणि विवरण लिहून विद्यार्थ्यांच्या मनातली नागेशाबद्दलची भीती दूर केली. "पाणिनीय व्याकरण आणि भाषातत्त्वज्ञान" या त्यांच्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. भाषाशास्त्र बाळबोध शैलीत समजावून सांगताना गुरुजींनी नर्मविनोदी शैली वापरली आहे. शब्दापेक्षा अगदी वेगळ्या अशा अर्थाचे ज्ञान शब्द ऐकल्यावर का व्हावं? गुरुजी म्हणतात, "अहो पण, व्यवहारामध्ये अनेकदा असे दिसते की आपण प्रत्यक्ष एक वस्तू पहात असतो तर त्याचवेळी दुसऱ्याही वस्तूचे ज्ञान आपणाला सहजासहजी होते.... देवळाबाहेर उघड्यावर नंदी पाहिल्यावर लगेच कोणताही शिवभक्त शंकराचे मंदिर समजून धाव घेतो. एकासंबंधीचे ज्ञान दुसऱ्या संबंधीची आठवण करून देत असते असा सिद्धान्त व्यवहारातील वरील प्रकारच्या नित्य अनुभवावरून सर्व शास्त्रकारांनी पूर्णपणे मान्य केलेला आहे. मग शब्दाच्या ज्ञानाने अर्थाची हमखास जाण यावी अगर अर्थाशीच व्यवहार व्हावा यात विसंगती ती कसली?" व्याकरण महाभाष्यकार पतंजलीच्या शैलीची छाप गुरुजींवर पडलेली जाणवते. महाभाष्यावरच्या 'सूक्तिरत्नाकर' या टीकेच्या संपादनाचे काम त्यांनी अलीकडे सुरू केले होते. आनंदाश्रमाने पहिल्या दोन आह्निकांचं संपादन नुकतंच प्रकाशित केलं. मात्र हा प्रकल्प गुरुजी पुरा करू शकले नाहीत.

१९७८ साली टि. म. वि. मधून निवृत्त झाल्यानंतरही "स्वाध्याय प्रवचनाभ्यां मा प्रमदः" हा मंत्र जपत गुरुजींनी वैदिक संशोधन मंडळात शास्त्रचूडामणि योजनेअंतर्गत अध्यापनाचे काम चालू ठेवलं. तसंच भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेच्या महाभाष्यदीपिकेच्या संपादनाच्या प्रकल्पात सहभागी होऊन त्यांनी सहाव्या आह्निकाचं मराठी भाषांतर आणि विवरण लिहून काढलं. महाराष्ट्र राज्य माध्यमिक

व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता ८ वी ते १२वी पर्यंतच्या संस्कृतच्या पाठ्यपुस्तकांच्या संपादनातही गुरुजींनी महत्त्वाचा वाटा उचलला.

आपल्या जवळजवळ ५० वर्षांच्या शैक्षणिक कारकिर्दीत गुरुजींनी संस्कृत विद्येचे प्रसारकार्यात उदंड योगदान दिले. आज महाराष्ट्रातल्या संस्कृतच्या अभ्यासाला प्राप्त झालेल्या विशिष्ट दर्जाला गुरुजींचे अध्यापन आणि प्रसारकार्य बऱ्याचअंशी कारणीभूत आहे. त्यांचे नामवंत विद्यार्थी देशोदेशी संस्कृत आणि विशेषतः भाषाशास्त्राचे अध्यापन करीत हे प्रसारकार्य पुढे नेत आहेत. संस्कृत व्याकरणावरची त्यांची पुस्तके "आणि ध्वनिमुद्रित व्याख्याने भाषाशास्त्राच्या विद्यार्थ्यांना वाट दाखवत रहाणार आहेत. 'पाणिनी प्रतिष्ठान' या गुरुजींनीच स्थापन केलेल्या न्यासाने त्यांच्या ध्वनिमुद्रित व्याख्यानांचे संपादन करून ते प्रारंभी पुस्तकरूपाने आणि नंतर क्रमशः सीडीच्या रूपात प्रकाशित करण्याची योजना आखली आहे.

आयुष्याच्या उत्तरार्धात "आता उरलो उपकारापुरता, नव्हे उपयोगापुरता" असं म्हणणाऱ्या गुरुजींनी शिकवता येत होतं तोवर दारी येणाऱ्या कोणाही जिज्ञासूला विन्मुख पाठविलं नाही, विद्या देणं आणि घेणं याखेरीज कसलाही ध्यास घेतला नाही. त्यांना मिळालेले सन्मान, मानपत्र यांचा त्यांनी अलिप्तपणे स्वीकार केला. पुढील अभ्यासकांकडून अपेक्षा व्यक्त करताना त्यांनी लिहिलं आहे, "संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास वास्तववादी भूमिकेतून केला जावा. हजारो वर्षांच्या विचारांचा आणि इतिहासाचा तो अत्यंत दुर्मिळ असा ठेवा आहे. त्यात आजकालच्या दृष्टीनेही बऱ्याच चांगल्या गोष्टी आहेत, तर काही टाकाऊही आहेत. 'दृष्टं किमपि लोकेऽस्मिन् न निर्दुष्टं न निर्गुणम् । आवृणुध्वमतो दोषान् विवृणुध्वं गुणान् बुधाः॥' या सुभाषितात सांगितल्याप्रमाणे त्यातील चांगला भाग विस्ताराने मांडला पाहिजे. त्यामुळे त्याबद्दल आवड उत्पन्न झाली की माणूस सवड काढतो. याप्रमाणे आवड आणि सवड या दोन चाकांवर हा संस्कृतरथ अगदी अनंतकाल चालत राहील."

गुरुजींची संस्कृतविषयीची ही शुभ भविष्यवाणी संस्कृतविद्येच्या अभ्यासकांना आश्वासक ठरेल यात शंकाच नाही.

■

'ऋजु', निर्मलबाग, १५/४६ पर्वती, पुणे ९

परीक्षणलेख

साहित्यप्रकारांचे प्रयोजन

दिदेर कोस्त
भाषांतर - जयंत धुपकर

(**'इस्थेटिक्स ऑफ लिटररी क्लासिफिकेशन'**, डॉ. मिलिंद मालशे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००३ या ग्रंथाचे परीक्षण)

वसाहतवादोत्तर साहित्याभ्यासामध्ये कोणाचा वरचष्मा असेल तर तो भारतात असणाऱ्या किंवा मुळात भारतीय असणाऱ्या परंतु आता इतरत्र स्थायिक झालेल्या प्राध्यापकांचा आहे, ही गोष्ट उघडच आहे. गायत्री चक्रवर्ती-स्पीवाक, होमी भाभा, अर्जुन अप्पादुराई, लीला गांधी, अनिया लुंबा, ही त्यापैकी काही आघाडीची नावे आहेत. मात्र भारतीय उपखंडातील प्रकाशकांनी प्रसिद्ध केलेल्या साहित्यशास्त्रावरील तसेच तुलनात्मक साहित्याभ्यासावरील दर्जेदार लेखनाची फारशी माहिती फ्रांसमध्ये उपलब्ध नाही, इतकेच नव्हे तर आंग्लभाषीय जगालाही या लेखनाची फारशी माहिती नाही. मुंबईच्या आय. आय. टी. या संस्थेत इंग्लिशचे प्राध्यापक असणारे भाषातज्ज्ञ, चिन्हमीमांसक तसेच संगीततज्ज्ञ मिलिंद मालशे यांचे लेखन या दुसऱ्या प्रकारात मोडणारे आहे. त्यांच्यासारख्या आधुनिक पौर्वात्य लेखकांनी साहित्यशास्त्रामध्ये घातलेली भर पाश्चात्य जगाला अजूनही अपरिचित आहे.

प्राध्यापक मालशे यांनी 'इस्थेटिक्स ऑफ लिटररी क्लासिफिकेशन' या लहानशा ग्रंथात एक फार महत्त्वाकांक्षी विषय थोडक्यात मांडायचा प्रयत्न केलेला आहे, असे वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुतः तसे झालेले नाही. त्यांची भूमिका तर्कशुद्ध, व्यामिश्र आणि बहु-अभ्यासक्षेत्रीय आहे. तसेच संरचनात्मक आणि ऐतिहासिक अशा दोन्ही अंगांनी जाणारी आहे; आणि त्यांच्या मांडणीमध्ये जी आदर्शवत् अशी स्पष्टता आहे तिच्यामुळे त्यांना मोठा विषय थोडक्यात मांडणे शक्य झाले आहे. साहित्यप्रकारांविषयीच्या समग्र प्रश्नाचा मुळापासून पुनर्विचार करणे, प्रकारांच्या ऐतिहासिक अभ्यासाला नवा पाया व नवे प्रयोजन देणे, त्याचप्रमाणे

समकालीन साहित्याच्या अभ्यासाला उपयुक्त ठरू शकेल असे व अध्यापनाच्या दृष्टीने सुयोग्य असे (साहित्याच्या) संज्ञापनप्रक्रियेचे एक अद्ययावत् व समर्थ असे प्रतिमान वाचकांपुढे मांडणे, हे त्यांच्या ग्रंथाचे प्रयोजन आहे. त्यांनी प्रस्तावनेच्या प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे साहित्यप्रकारांच्या संकल्पनेची मांडणी साहित्यिक मूल्याच्या चौकटीत करणे, म्हणजेच व्यवस्था प्रत्यक्ष सौंदर्यात्मक व्यवहारामध्ये कशी अवतरते याचा विचार करणे; हे या पुस्तकाचे प्रयोजन आहे; "साहित्याच्या वर्गीकरणाचा प्रश्न साहित्याइतकाच जुना आहे; साहित्य उगम पावते त्या क्षणीच साहित्याचे वर्गीकरणही उगम पावते कारण वर्गीकरणाचा प्रश्न हा साहित्याची निर्मिती आणि त्याचे ग्रहण या प्रक्रियांमध्ये अनुस्यूतच आहे. इतर भाषिक कृतींपासून साहित्याला सहजपणे वेगळे करतानाच साहित्याच्या वर्गीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ होतो, आणि साहित्याच्या परंपरेबरोबरच वर्गीकरणाची प्रक्रियाही विकसित होत जाते आणि विस्तारत जाते." (प्रास्ताविक, पृ. सात).

पारंपरिक विचाराचा पाया आणि त्याच्यापुढील समस्या

या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणामध्ये वर्गीकरणाच्या प्रश्नाचा व प्रयोजनाचा विचार ज्ञानात्मक व वैज्ञानिक संदर्भात केलेला आहे. त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानात्मक व सौंदर्यशास्त्रीय चौकटीतही केलेला आहे. स्वच्छंदतावादी व विश्वचैतन्यवादी तत्त्वज्ञानात्मक व सौंदर्यशास्त्रीय चौकटीतही केलेला आहे. स्वच्छंदतावादी व विश्वचैतन्यवादी तत्त्वज्ञांनी (कांट, क्रोचे, वॉल्टर पेटर) कलेमध्ये वर्गीकरण अनावश्यक ठरविण्याचा जो प्रयत्न केलेला आहे त्यावरील आक्षेपांचे सूतोवाच येथे केलेले आहे; पुढे चौथ्या प्रकरणामध्ये हेच मूलगामी आक्षेप विस्ताराने मांडलेले आहेत. एक म्हणजे सौंदर्याचे क्षेत्र मानवी अनुभव व व्यवहारांच्या इतर क्षेत्रांपासून वेगळे काढायचे असेल तर वर्गीकरणाला अनावश्यक मानण्याचे प्रयत्न आत्मव्याघाती ठरतात. "सौंदर्यशास्त्रीय संकल्पनांची व्याख्या करणे आणि कलावस्तूंचे वर्गीकरण करणे शक्य आहे का, या प्रश्नांविषयी दोन परस्परविरोधी भूमिका शक्य आहेत." (पृ. ३) हे प्रथम ध्यानात घ्यायला हवे. एक भूमिका म्हणजे प्लेटोची एकसत्त्ववादी भूमिका; या भूमिकेनुसार एखाद्या गुणधर्माच्या वा गुणधर्मसमूहाच्या आधारे वर्गाची व्याख्या देता येते (ॲरिस्टॉटलचा अनुकृतीचा सिद्धांत या भूमिकेचेच एक उदाहरण आहे). याच्या अगदी विरुद्ध भूमिका म्हणजे नाममात्रवादी भूमिका होय; या भूमिकेनुसार प्रत्येक सुंदर वस्तू अनन्य असते व तिचे वर्गीकरण शक्य नसते (उदाहरणार्थ, वॉल्टर पेटरची भूमिका). या दोन

भूमिका परस्परांसमोर ठेवल्या आहेत; एकसत्त्ववादी भूमिका ही प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा संक्षेप करणारी आणि मूल्यमापनात्मक आहे, तर नाममात्रवादी भूमिकेला छेद मिळतो तो प्रत्यक्ष कलावंतांमध्येच वसणाऱ्या समीक्षादृष्टीने, तसेच सक्षम वाचकांच्या प्रत्यक्ष वाचनक्रियेने.

दुसऱ्या प्रकरणामध्ये आधुनिक समीक्षेने साहित्याभ्यासाच्या क्षेत्राची जी आखणी केलेली आहे तिच्याविषयी आणि साहित्याभ्यासाच्या विविध प्रतिमानांमध्ये साहित्याच्या वर्गीकरणाच्या संकल्पनेला कोणते स्थान आहे, या प्रश्नाविषयी ऊहापोह केलेला आहे. "न्यू क्रिटिक्स" म्हणून ओळखले जाणारे समीक्षक असोत, वा डेविड डेर्चाझ असोत, वा रेने वेलेक आणि ऑस्टिन वॉरन असोत, या सर्व समीक्षकांना वर्गीकरणाची संकल्पना वापरावीच लागली आहे, हे स्पष्ट होते. सौंदर्यवस्तूचे अनन्यत्व प्रस्थापित करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी वर्गीकरणाची संकल्पना निदान प्रत्यक्ष पातळीवर तरी अपरिहार्य ठरते. वर्गीकरणाला एककालिक आणि कालक्रमिक अशी दोन अंगे असतात आणि त्यांच्यामध्ये परस्परप्रक्रिया सतत चालू असते, हेही येथे स्पष्ट केलेले आहे. साहित्यप्रकारांच्या उत्क्रांतीचे इतिहास, आणि विशिष्ट काळामध्ये विशिष्ट साहित्यप्रकारांचे प्राबल्य कसे होते हे दर्शवून त्याच्या आधारे कालखंड निश्चित करणारे साहित्येतिहास, या दोहोंमध्ये या पस्परप्रक्रियेचे पुरावे आढळतात. पारंपरिक मार्क्सवादी समीक्षेमध्ये साहित्यकृतींना ऐतिहासिक संदर्भात प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेमध्ये साहित्यप्रकारांची संकल्पना अर्थातच वापरलेली आहे. मिखाइल बाख्तिन हा समीक्षक त्याहीपुढे जाऊन "मार्क्सवादाकडून मिळालेली ऐतिहासिकतेची संकल्पना आणि रूपवादाकडून मिळालेली प्रकारांची संकल्पना" यांचा मिलाफ करून एक "अत्यंत विचक्षण भूमिका" मांडतो (पृ. १६) ग्रहणलक्ष्यी सौंदर्यशास्त्रामधील "अपेक्षांची क्षितिजे" संकल्पनेमध्ये साहित्य-प्रकारांना पुन्हा स्थान मिळालेले आहेच. याउलट, आय. ए. रिचर्डस् याच्या "उपयोजित समीक्षे"पासून "न्यू क्रिटिसिझम"पर्यंतच्या समीक्षेमध्ये साहित्यसंहितांच्या "सेंद्रिय एकात्मते"ला महत्त्व देऊन वर्गीकरणाच्या संकल्पनेला नाकारलेले आहे. "सेंद्रिय एकात्मते"ची ही संकल्पना भावकाव्य या साहित्यप्रकाराच्या प्रतिमानाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या स्वच्छंदतावादी आणि प्रतीकवादी भूमिकांकडून आधुनिक समीक्षेला मिळालेला वारसाच आहे. साहित्यप्रकारांची संकल्पना मुळापासून नाकारणे आणि भावकाव्याला साहित्यप्रकारांच्या श्रेणिव्यवस्थेमध्ये अग्रस्थानी बसविणे, अशी परस्परविसंगत

तत्त्वे या भूमिकेमध्ये आहेत. त्याचप्रमाणे टॉम जोन्झ किंवा ॲना कॅरेनिना यासारख्या कथनात्मक संहितांना "विस्तारित रूपके" मानणे म्हणजे भाबडेपणाच होय. मिलिंद मालशे यांनी मिखाइल रिफाते यांच्या सिद्धांताचा व समीक्षेचा उल्लेख केलेला नसला तरी रिफाते यांनी 'सेमिऑटिक्स ऑफ पोएट्री' या ग्रंथात मांडलेल्या काव्याच्या चिन्हमीमांसेमध्ये काव्यासाठी वापरले जाणारे प्रतिमान गद्य-कथनाला लावून दाखविण्याचा जो उद्योग केलेला आहे, त्याच्याविषयीसुद्धा याच प्रकारचे प्रश्न उपस्थित करता येतील, असे मला वाटते.

या प्रकरणाच्या शेवटी मालशे यांनी संज्ञापनाच्या संकल्पनेवर आधारलेले एक अगदी सुटसुटीत असे प्रतिमान साहित्याच्या संदर्भात सुचविलेले आहे आणि त्याच संदर्भात दोन महत्त्वाचे मुद्दे मांडलेले आहेत;

(अ) "संपूर्ण साहित्यिक व्यवहार समाजिक-सांस्कृतिक परंपरांच्या चौकटीमध्ये नियत झालेला असतो.. मात्र परंपरा याचा अर्थ पूर्णपणे निर्धारित, अचल, अपरिवर्तनीय रूढी असा घ्यायचा नाही, तर ऐतिहासिक बदलाला सन्मुख असणाऱ्या गतिशील प्रमाणकांची एक व्यवस्था, असा घ्यायचा आहे' (पृ. २६) आणि (आ) लेखक-संहिता-वाचक या शृंखलेच्या दोन्ही टोकांना "स्व-सुधारणा' करणारी एक प्रक्रिया चालू असते (पृ. २६) या प्रतिमानामधील प्रत्येक प्रक्रियेमध्ये साहित्यप्रकारांची संकल्पना महत्त्वाचे कार्य बजावीत असते. साहित्याच्या व्यवस्थेची मांडणी करताना प्रकारनिष्ठ निकष प्रस्थापित होणे आणि त्यांचे वेगवेगळ्या प्रकारे उल्लंघन होणे, अशी वर्गीकरणनिष्ठ मांडणी त्यामुळे शक्य होते.

"पारंपरिक प्रतिमाने" असे शीर्षक असणाऱ्या तिसऱ्या प्रकरणात प्रारंभीच्या काही पृष्ठांमध्ये भरताने (दोन हजार वर्षांपूर्वीच मांडलेल्या) अभिजातकालीन भारतीय काव्यशास्त्राच्या परंपरेचा मालशे यांनी आढावा घेतलेला आहे (तो जरा अधिक विस्ताराने घ्यायला हवा होता) नाट्यकला ही धार्मिक परंपरेबाहेर असणाऱ्या साहित्याचा गाभा होती; या नाट्यकलेचे वर्गीकरण भरताच्या सिद्धांतामध्ये रूपनिष्ठ व भाषिक निकष वापरून, त्याचप्रमाणे सादरीकरणाच्या शैलींवर आधारलेले निकष यांच्या साहाय्याने अत्यंत सूक्ष्मपणे केलेले आहे. सातव्या आणि आठव्या शतकामध्ये भामह आणि दण्डि यांच्या विवेचनात काव्याची संकल्पना नाट्यापुरती मर्यादित राहिली नाही आणि तिच्यात अनेक नव्या प्रकारांची भर पडत गेली. ॲरिस्टॉटलच्या विचारांच्या बाबतीतही नेमके असेच घडले होते. संस्कृत काव्यशास्त्रीय विचारांची परंपरा आशयात्मक आणि अलंकारशास्त्रीय निकषांची भर पडून अधिक समृद्ध

होत गेली. यानंतर मालशे यांनी केलेली ॲरिस्टॉटलच्या काव्यशास्त्रातील प्रकारनिष्ठ विचारांची चिकित्सा उत्कृष्ट आहे. या विचारातील बलस्थाने व त्याच्या मर्यादा त्यांनी दाखवून दिल्या आहेत. 'दाखविणे' आणि 'सांगणे' या भेदावर आधारून साहित्याचे वर्गीकरण प्लेटोपासून सुरू झाले; या वर्गीकरणामध्ये काव्याच्या किंवा त्या काळात अ-नाम असणाऱ्या साहित्यकलेच्या प्रांतात भावकाव्य या प्रकाराला स्थान नव्हते, कारण त्याकाळी भावकाव्येही वाचण्यासाठी नसून मूलतः गायनासाठी होती; ॲरिस्टॉटलप्रणित वर्गीकरणामध्ये एककालिक आणि कालक्रमिक निकषांमध्ये एक निश्चित असे नाते होते मात्र ते काहीसे अस्पष्ट होते; या वर्गीकरणात साहित्याची उत्क्रांती आणि विकास यांच्याविषयी जो विचार मांडलेला आहे त्यात शोकात्मिका हा व्यामिश्र साहित्यप्रकार सर्वश्रेष्ठ आणि उत्क्रांतीच्या अग्रस्थानी असणारा प्रकार मानला गेलेला आहे. शेवटचा मुद्दा म्हणजे ॲरिस्टॉटल याला द्विमानी भेदांचा (binarism) मोह पडलेला होता. (अभिजात भारतीय काव्यशास्त्रज्ञांना हा मोह पडला नसावा असे दिसते) आणि याचे प्रत्यंतर पुढच्या पाश्चात्य काव्यशास्त्राच्या परंपरेत वारंवार येत रहाते. दोन गोष्टींची अनुकृती होत असते : एक निसर्ग किंवा वास्तव, तर दुसरे होमरसारखे पूर्वकालीन श्रेष्ठ कवी. अनुकृतीच्या या दुहेरी उद्दिष्टांमधील हे ताणतणाव आणि विरोध आहेत. पाश्चात्य परंपरेत अनुस्यूत असणाऱ्या द्विमानी भेदसंकल्पनेला त्यांनी जसे समृद्ध केले तसे पराभूतही केले. या दोन्ही विकल्पांपेक्षा वेगळा तिसरा विकल्प - मग तो (नाकारलेल्या किंवा उदात्तीकरण झालेल्या) मिश्र प्रकारांचा असो किंवा वगळलेल्या तिसऱ्या प्रकाराचा असो (उदाहरणार्थ भावकाव्य) - हा साहित्याच्या मूल्यव्यवस्थेचा मर्मबिंदू असतो असे मिलिंद मालशे यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या या कल्पना अत्यंत सूचक आहेत. त्याचप्रमाणे विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या काळानंतर काव्यप्रकारांची जी खुली वर्गीकरणे प्रकाशात आली त्यावरही त्यांनी सूचक भाष्य केलेले आहे. याची ग्रंथांच्या पुढच्या आवृत्तीमध्ये त्यांनी अधिक विस्ताराने मांडणी करावी अशी माझी कळकळीची सूचना आहे.

फील्डिंग याने दिलेल्या कादंबरीच्या व्याख्येच्या संबंध मालशे यांनी नव-अभिजातवादी परंपरेशी जोडलेला आहे व त्यामुळे प्रारंभीच्या स्वच्छंदतावादी वास्तववादाची जहाल क्रांतिकारी भूमिका त्यांनी काहीशी मवाळ केलेली आहे : "फिल्डिंग याने दिलेली कादंबरीची व्याख्या म्हणजे साहित्यप्रकारांच्या उपलब्ध संकल्पनांमधून नव्या साहित्यप्रकाराचे वर्णन करण्याचा समकालीन चिकित्सक

मनाने केलेला प्रयत्न होय." (पृ.५०) असे मालशे म्हणतात. हे खरे असले तरी मला असे वाटते की येथे एक दुहेरी विरोधाभास निर्माण झाला आहे. आदर्शवाद आणि सहजप्रेरणावाद या परस्परविरोधी भूमिकांतून तो निर्माण झालेला आहे. अभिजातवादी मूल्यपरंपरेच्या सूत्रबद्धतेला आणि रुढीबद्धतेला छेद मिळाला तो मूलतः अनन्यतेच्या आणि नवतेच्या स्वच्छंदतावादी कल्पनांमुळे मिळाला व त्यातूनच अभिजातवादी परंपरा भंग पावली. मालशे म्हणतात त्याप्रमाणे शिकागोप्रणालीचे नव-ॲरिस्टॉटलवादी समीक्षक आज अल्पमतात आहेत आणि "बहुतेक आधुनिक समीक्षक अभिजातवादाच्या व नव-अभिजातवादाच्या नैतिक व अनुकृतीवादी गृहितकृत्यांना धुडकावतात" आणि त्याहीपुढे जाऊन मिखाईल बाख्तिन याने चर्चिलेले "संकीर्ण" प्रकार, त्याचप्रमाणे "स्थिरावलेल्या प्रकारांची उलटापालट करून निर्माण झालेले" (carnivalized) प्रकार श्रेष्ठ मानू पहातात! (पृ.५२) या उलट साहित्यप्रकारांविषयीच्या पारंपरिक सिद्धांताचे खरे बलस्थान म्हणजे "साहित्याची एक सामाजिक - सांस्कृतिक व्यवस्था" (पृ.५२) म्हणून झालेला विचार होय. या विरोधाभासाच्या संदर्भामध्ये नव-कादंबरीविषयीचे सूत्रबद्ध सिद्धांत त्याचप्रमाणे आजचे इतर काही समीक्षात्मक लेखन मुळापासूनच तपासायला हवे.

मालशे यांच्या ग्रंथातील चौथ्या प्रकरणाचे शीर्षक "पारंपरिक प्रतिमानाला आव्हान" असे आहे. अभिजातवादी पारंपरिक सिद्धांतामधील "दाखविणे - सांगणे" या द्विपदात्मक मांडणीला स्वच्छंदतावादी विचारचौकटीमध्ये भावकाव्य - महाकाव्य - नाट्य असे नवे त्रिपदात्मक रूप मिळते. या नव्या मांडणीमध्ये "भावकाव्यात्म आत्मनिष्ठता" ही अग्रस्थानी असणारी, आदिम आणि पायाभूत स्वरूपाची गोष्ट आहे. कथनात्म वस्तुनिष्ठता ही दुसऱ्या स्थानावर आहे तर नाट्यामधील आत्मनिष्ठ व वस्तुनिष्ठ यांचे मिश्रण हे अखेरच्या स्थानावर आहे. साहित्यप्रकारांच्या पारंपरिक प्रतिमानाला जे आव्हान मिळाले त्याची दोन रूपे होती : एक रूप म्हणजे (कांट व क्रोचे यांनी मांडलेल्या मतांनुसार) सौंदर्यात्मक वस्तू मूलतः अनन्य असतात, हे तत्त्व होय. दुसरे रूप म्हणजे (नीत्शे ते उत्तरसंरचनावाद) मानवी अनुभव आणि कृती यांचे कोणतेही वर्गीकरण निषिद्ध मानणारी भूमिका होय. यात सत्यं-शिवं-सुंदरम् या मूलभूत कोटींचाही समावेश होतो. ही दुसरी भूमिका ही आत्मनिष्ठतावादी आणि विवेकवादविरोधी आहे.

कांटच्या 'क्रिटीक ऑफ जजमेंट' या ग्रंथाच्या संदर्भात असे म्हणता येईल की केवळ व्यावहारिक पातळीवरची वर्गीकरणे सोडता अन्य सर्व वर्गीकरणांना

कलेच्या संदर्भात नकार देणारी भूमिका ही कांटने मांडलेल्या एका विशिष्ट तत्त्वावर आधारलेली आहे. हे तत्त्व म्हणजे "अभिरुचीची सर्व विधाने ही तार्किकदृष्ट्या व्यक्तिवाचक विधाने असतात" हे होय. याचा एक अर्थ असा होतो की सौंदर्यवाचक विधानांचे सामान्यीकरण वा साधारणीकरण शक्य नसते, त्यांना विशिष्ट वर्गातील सर्व वस्तूंना लावता येत नाही व त्यामुळे त्यांना वस्तुनिष्ठ मान्यता प्राप्त होऊ शकत नाही; आणि दुसरा अर्थ असा होतो की सौंदर्यवाचक विधान हे ज्ञानवाचक विधानापेक्षा मूलतः भिन्न ठरते. सौंदर्याविषयीची सामान्य विधाने किंवा संकल्पना म्हणजे सुट्या सुट्या सुंदर वस्तूंच्या विशिष्ट अनुभवांची एक मालिका असते व जी काही "ज्ञातृनिष्ठ सार्वत्रिकता" त्यांना असते ती एका व्यक्तीच्या अनुभवाचे इतर मानवी व्यक्तींवर प्रक्षेपण केल्यामुळे निर्माण झालेली असते.

खुद्द क्रोचे याने कांटवर अशी टीका केलेली आहे की त्याच्या सिद्धांतामध्ये सृजनशील कल्पनाशक्तीच्या संकल्पनेचा अभाव आहे. क्रोचेने स्वतः प्रातिभ ज्ञानासंबंधीचा एक सिद्धांत मांडायचा प्रयत्न केलेला आहे. या सिद्धांतानुसार प्रातिभ ज्ञान हे प्रतिभाशक्तीवर वा सृजनशील कल्पनाशक्तीवर आधारलेले असते, संवेदना किंवा त्यांचे परस्पर संबंध हे या शक्तीच्या ज्ञानवस्तू असतात, आणि त्यातून व्यक्तिभूत, अनन्य अशा प्रतिमा निष्पन्न होतात. गद्य नव्हे तर "काव्य" हे या प्रकारच्या प्रातिभ ज्ञानाचे प्रतिमान असते. ब्रूनेतिए याच्यासारख्या साहित्येतिहासकाराने मांडलेली कलेच्या सेंद्रिय उत्क्रांतीची कल्पना ही या सिद्धांतानुसार मुळातच चुकीची ठरते आणि साहित्याचे प्रकारांमध्ये वर्गीकरण करणे हे सौंदर्यशास्त्रीय कृत्य ठरूच शकत नाही.

सौंदर्यशास्त्रीय नाममात्रवादाच्या या मांडणीनंतर मिलिंद मालशे या भूमिकेचे खंडन करण्यासाठी कांट व क्रोचे यांना पुढील तीन प्रश्न विचारतात (पृ. ६३) :

१. "सौंदर्यवाचक विधाने जर संकल्पनाविरहित आणि व्यक्तीवाचक असतील... तर सौंदर्यानुभवाच्या क्षेत्रात समीक्षात्मक व्यवहार शक्य तरी होईल का?"

२. "सौंदर्यात्मक व्यवहार जर पूर्णपणे प्रातिभ ज्ञानावर आधारलेला असेल वा प्रातिभ ज्ञानाच्याच स्वरुपाचा असेल... तर सौंदर्यात्मक वस्तूंची ओळख पटणे, त्यांचे वर्णन करणे, त्यांचा अर्थ लावणे, त्यांची तुलना करणे आणि त्यांचे मूल्यमापन करणे या क्रियांना काही जागा राहते का?"

३. "कलापरंपरा, कलात्मक संकेत आणि कलात्मक व्यवस्था यांना असणाऱ्या सामाजिक - सांस्कृतिक संदर्भाला विचारात न घेणारा सौंदर्यसिद्धांत

आपल्याला कला व साहित्य यांच्या स्वरूपाविषयी मर्मदृष्टी देऊ शकेल का?"

या तीन प्रश्नांच्या उत्तरादाखल हेन्री मूर, व्हॅन गॉग आणि टी. एस्. एलियट यांच्या कलाविषयक भूमिकांची मांडणी करून नाममात्रवादाविरुद्ध समर्थ युक्तिवाद मालशे यांनी केलेला आहे. तो येथे तपशीलवार देण्याचे टाळून आपल्याला इतकेच नोंदविता येईल की सौंदर्यशास्त्रीय नाममात्रवाद आणि आविष्कारवाद या दोन्ही भूमिकांनुसार साहित्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या तुलनेला किंवा मूलभूत संकल्पनेला किंवा सामान्य तत्त्वांना स्थान नसते. ग्योएटे याच्या "वैश्विक साहित्या"च्या संकल्पनेला पूर्णपणे विरोधी असणाऱ्या अशा या (कांट व क्रोचे यांच्या) भूमिका आहेत. साहित्याच्या संज्ञापनाच्या प्रक्रियेमध्ये साहित्याच्या वर्गीकरणाची प्रक्रिया दडलेलीच असते आणि तिच्याशी ग्योएटे याच्या "वैश्विक साहित्य" या संकल्पनेची नाळ जुळते. साहित्याचे वर्गीकरण ही संकल्पना एक अत्यावश्यक अशी स्वायत्त वा स्वयंसिद्ध संकल्पना मानायला हवी. (म्हणजे असे की प्रत्यक्ष संहितांमध्ये प्रकार कसे मूर्त होतात याचा विचार तत्त्वतः स्वतंत्रपणे करायला हवा) हे यावरून स्पष्ट होते. अखेरचा मुद्दा असा की अस्सल सामाजिक - सांस्कृतिक समीक्षकांनी विशिष्ट, सुट्या सुट्या साहित्यकृतींना अभ्यासवस्तू म्हणून न मानता साहित्य प्रकारांना अभ्यासवस्तू मानायला हवे; यातून सौंदर्यतत्त्वाला नकार मिळणार नसून पुष्टीच मिळणार आहे. आज तुलनात्मक साहित्याचे काही विशेषज्ञ सुट्या सुट्या संहितांमधून विषयसामग्री जमवू पाहतात; अशा अभ्यासकांना तसेच ऐतिहासकतेचे तत्त्व या ना त्या स्वरूपात वापरणाऱ्या अभ्यासकांना मालशे यांच्या या विवेचनामधून सावधानतेचा इशाराच मिळालेला आहे.

याच प्रकरणाच्या पुढच्या दोन छेदकांमधून मालशे यांनी तार्किक व ऐतिहासिक अशा दोन्ही दृष्टींनी परस्परांशी संबंधित असणाऱ्या नीत्शे, हायडेगर आणि देरिदा यांच्या सिद्धांतांची मांडणी केली आहे व त्यांवर मूलभूत असे आक्षेपही घेतले आहेत. "आपण जो दृष्टिकोन स्वीकारू त्यानुसार या सिद्धांतकारांना "आत्मनिष्ठतावादी", "संशयवादी", "विवेकवादविरोधी", "शून्यवादी" अशी नावे देता येतील". हे सांगताना मालशे यांनी मोठेच धाडस दाखविले आहे. (पृ.६८) आपल्या 'बर्थ ऑफ ट्रॅजिडी' या ग्रंथामध्ये नीत्शे याने वास्तव आणि ज्ञान या संकल्पनांना बाजूला सारून जिवाच्या केवळ अस्तित्त्वावर भर दिल्यामुळे सॉक्रेटिक पद्धतीच्या ज्ञानालाच केवळ नाकारलेले आहे असे नव्हे तर सौंदर्य, घाट व सुसंगती या मूल्यांना जपणाऱ्या अभिजातवादी वा अपोलो-धर्तीच्या कलेलाही नकार दिलेला

आहे, आणि त्याचबरोबर सांगीतिक, भावकाव्यात्म, मिथकात्म व आध्यात्मिक मूल्ये जपणाऱ्या स्वच्छंदतावादी वा डायोनायसस-धर्तीच्या कलेलाही नकार दिलेला आहे. याचा परिणाम असा झाला की अभिजातवादी व नव-अभिजातवादी सिद्धांताने मांडलेली संपूर्ण वर्गीकरणव्यवस्थाच छिन्नविच्छिन्न होऊन मुळापासून उध्वस्त झाली. ॲरिस्टॉटलप्रणित सिद्धांतांच्या या विरोधाला कोणताही वैचारिक पाया नाही. स्वतः नीत्शेने काव्यप्रकारांच्या काही संकल्पना थोड्याफार सुसंगतपणे वापरलेल्या आहेत, परंतु त्यांचाच चुकीचा वापर करून, खेळाचे नियम बदलून संपूर्ण खेळच लबाडीचा आहे, असे दाखविण्याचा प्रयत्न त्याने केलेला आहे. नीत्शेच्या सैद्धांतिक भूमिकेतील या अस्वस्थ करणाऱ्या विरोधाभासांना आणि विसंगतींनाच काही लोकांनी "कलात्मक" मानले आहे हे खरे असले तरी पुढे अस्तित्त्ववाद ते उत्तरसंरचनावाद या भूमिकांच्या वर्गीकरणविरोधी प्रवासामध्ये नीत्शेची सिद्धांतविरोधी भूमिकाच पायाभूत ठरलेली आहे.

नीत्शेच्या लेखनाप्रमाणे, किंवा कदाचित त्याहूनही अधिक प्रमाणामध्ये हायडेगर याचा "कवीच्या रूपातील विचारवंत" ("द थिंकर ॲज पोएट") हा निबंध म्हणजे "पद्यरूप गूढरम्य चिंतन" आहे. (पृ. ७२) या चिंतनामध्ये काव्यात्म पद्धतीने एक काव्यशास्त्रीय सिद्धांतच मांडलेला आहे. हा निबंध म्हणजे अर्थाला नकार देऊन भाषेच्या अनिर्बंध शक्तींमधून कलात्मक विचार कसा जन्म घेतो हे दाखवून देणारे एक स्वयंपूर्ण उदाहरणच आहे. हायडेगर याची ही भूमिका हुसर्ल याच्या "ट्रान्सण्डेण्टल रिडक्शन" या प्रक्रियेशी मिळतीजुळती आहे. चिकित्सक आणि ज्यांतून हाती काही लागू शकेल अशा प्रयत्नांच्या ऐवजी या सर्व लेखनातून विवेकहीनता प्रस्थापित केली जाते आणि तिला साक्षात्कारावरच्या विश्वासाचे पाठबळ दिले जाते. हे सर्व विश्वासार्ह ठरावे म्हणून हायडेगर अनेक प्रकारची भाषिक आतशबाजी करतो आणि मारूनमुटकून शैलीच्या कसरती करतो.

याच धर्तीवर आणि याच कारणासाठी देरिदाच्या "स्पीच ॲंड फेनॉमेना" या ग्रंथातील आणि "लॉ ऑफ झान्र" या निबंधातील विवेचनावरही मालशे यांनी आक्षेप घेतले आहेत. कोणत्याही प्रकारचे समर्थन न देता देरिदा असे मत मांडतो की एखाद्या संहितेने एका वा अनेक प्रकारांमध्ये सहभागी असणे याचा अर्थ ती संहिता त्या प्रकारांमध्ये पडते असा होत नाही. एखादी संहिता एखाद्या साहित्यप्रकाराच्या काही खुणा वापरते परंतु शेवटी त्या साहित्यप्रकारापासून

फारकत घेण्यासाठीच हा वापर असतो, असे त्याचे मत आहे. आता एखाद्या संहितेने असे का बरे करावे, असा प्रश्न उपस्थित होतोच. एका गोंधळात टाकणाऱ्या विभागामध्ये देरिदा याने असे विवेचन केलेले आहे की वर्गीकरणाचा नियम (म्हणजे साहित्यकृती विशिष्ट वर्गात मोडण्याचा नियम) हा तत्त्वतः स्वतःविरुद्ध कार्यरत होत असतो; वर्गीकरणाचा नियम हा वस्तुतः वर्गीकरणे अशुद्ध असण्याचे, ती उलटी-पालटी होण्याचे, वा भ्रष्ट होण्याचे तत्त्वच सुचवित असतो. मालशे यांनी यावरून असा निष्कर्ष काढला आहे की "वर्गीकरणाच्या नियमामध्ये वर्गीकरणाच्या भ्रष्टतेचा नियम अन्तुस्यूतच असतो असे दाखवून देण्याचा देरिदा याचा संपूर्ण प्रयत्न फार ओढून ताणून केलेला आणि असमर्थनीय आहे, कारण वर्गीकरणाच्या विशुद्धतेचा आग्रह हा वास्तविक पाहता नव-अभिजातवादी सिद्धांताबरोबरच लोप पावलेला आहे". (पृ. ८१) मी तर याही पुढे जाऊन असे म्हणेन की देरिदा यांच्या या प्रयत्नामधून नीत्शे व हायडेगर यांच्यापासून सुरू झालेले अशुद्धता - भ्रष्टता - संकर या तत्त्वाचे प्रकटीकरण होते. हे तत्त्व तत्त्वज्ञान व साहित्य - विशेषतः काव्य - या क्षेत्रांत नव-स्वच्छंदतावादी, विसंगतीवादी, आविष्कारवादी आहे. देरिदा या तत्त्वाला जरी आपल्या लेखनाचे महत्त्वाचे ज्ञापक बनवू पाहात असले तरी त्याच्याविषयी सिद्धांत मांडणे वा त्या तत्त्वाला तार्किक निष्कर्षापर्यंत घेऊन जाणे हे त्यांना जमलेले नाही; आणि याचे कारण दुसरे - तिसरे काही नसून लेखनाच्या वर्गीकरणाला देरिदा यांनी दिलेला स्वच्छंदतावादी नकार हेच आहे.

या विभागाच्या शेवटी विरचनावादी सिद्धांताच्या आधिभौतिक गृहीततत्त्वांविषयी अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत : अ) संहितेची व्याप्ती (अर्थविवरणाच्या प्रक्रियेला कोणतीही आडकाठी न करता आणि प्रस्तुत - अप्रस्तुताचा विचार न सोडता संहितेची व्याप्ती कोठवर ताणता येईल : "लेडी मॅक्बेथला किती मुले होती?") आ) संहितेचा एकच एक अर्थ लावणारी एखादी तटस्थ आणि वस्तुनिष्ठ भूमिका असूच शकत नाही, हे विरचनावादी गृहीत तत्त्व आपण कुठपर्यंत स्वीकारू शकतो? उदाहरणार्थ, स्त्रीवादी समीक्षेमध्ये एक स्त्रीत्व असणारा स्व आपण स्वीकारत असलो तर याचा अर्थच असा आहे की तेथे एक सुसंगत, विविध घटकांचे एकत्रीकरण करणारे एक ज्ञातृतत्त्व आपण गृहित धरत असतो. इ) शेवटी अधिक सामान्य पातळीवर तोदोरोवच्या सुरात सूर मिसळून आपल्याला असे विचारावे लागते की नीत्शे, हायडेगर आणि देरिदा यांचा

संशयवाद, व्यक्तिनिष्ठतावाद आणि शून्यवाद यांच्यामुळे आपल्या अस्तित्वातील मानवी घटकांची ओळख पटणे व त्यांचे मूल्यमापन करणे अशक्य तर होऊन बसत नाही ना? त्यांच्या या भूमिकांमुळे केवळ ज्ञान आणि मूल्यमापन यांच्या संबंधीची निश्चितता अशक्य ठरली आहे असे नव्हे, तर "ज्ञान प्राप्त करून घेणे आणि मूल्यमापन करणे, म्हणजेच विज्ञान प्रस्थापित करणे आणि (नैतिक व सौंदर्यात्मक) मूल्यांच्या व्यवस्था निर्माण करणे, या क्रियाच मुळापासून नष्ट केल्या जातात" (पृ. ८३). माझी स्वतःची धारणा अशी आहे की वर्गीकरणाचे सौंदर्यशास्त्रीय तत्त्व नाकारणे हे राजकीयदृष्ट्या अत्यंत धोकादायक आहे.

कराराधिष्ठित प्रतिमानाचे समर्थन

मालशे यांच्या ग्रंथाचा शेवटचा भाग (प्रकरणे ५ व ६) इतर भागांइतकाच नावीन्यपूर्ण असला तरी त्याच्या तपशीलात आपण येथे शिरणार नाही. या भागामध्ये शेक्स्पियर, वर्डस्वर्थ, हॉपकिन्झ, व्हर्जिनिया वुल्फ आणि बेकेट यांच्या लेखनातील उदाहरणांचे प्रकारनिष्ठ विश्लेषण समर्थपणे केलेले आहे. परंतु या तपशीलात न शिरता या भागाची केवळ रूपरेषा आपण पाहू. फ्रेंच भाषिक वाचकाला ही (इंग्लिश उदहरणे) विघ्नांच्या स्वरूपाची वाटणार नाहीत अशी मला आशा आहे कारण त्यांच्या मागील युक्तिवाद मांडण्यासाठी कोणत्याही भाषेतील उदाहरणे चालू शकतील.

संरचनावादी भाषाविज्ञानावर आधारलेली भूमिका पायाभूत मानून येथे तीन मुख्य संकल्पना एकत्र आणलेल्या आहेत; त्या संकल्पना म्हणजे साहित्यिक क्षमता, साहित्यिक व्यवस्था आणि आंतरसंहितात्मकता या होत. पहिली संकल्पना नोम चॉम्स्की याने मांडलेल्या भाषिक क्षमता व भाषिक प्रयोग या भेदावर आधारलेली आहे. (मुळात जोनाथन कलर आणि इतर काहींनी ही संकल्पना विकसित केलेली आहे, मात्र माझ्या मते कलर यांची मांडणी फारशी समाधानकारक नाही) दुसऱ्या संकल्पनेच्या मुळाशी विशेषतः क्लोद गिलेन यांनी मांडलेला सिद्धांत आहे, तर तिसरीच्या मुळाशी रशियन रूपवादी परंपरेचा वारसा असणाऱ्या तोदोरोव आणि ज्यूलिया क्रिस्तेवा या फ्रेंच संरचनावादी विचारवंतांचे सिद्धांत आहेत. या तीन संकल्पनांचा मिलाफ करून मालशे यांनी जी मांडणी केलेली आहे ती वेधक आहे : "संरचनावादी समीक्षक हे साहित्यसंबंधीच्या एका मूलभूत विरोधाभासाशी झगडत आहेत; एका दृष्टीने साहित्यिक संहिता ही अनन्य किंवा अपरिचित असते, कारण तिच्यातील काल्पनिकतेमुळे ती एकतर नेहमीच्या भाषिक संज्ञापनाहून भिन्न ठरते.

तसेच तिच्या अनन्य सेंद्रिय घाटामुळे ती इतर साहित्यसंहितांहून भिन्न ठरते, मात्र दुसऱ्या बाजूने साहित्यासंबंधीच्या सामान्य संकल्पना, तत्त्वे, वर्गीकरणे, निकष, माध्यमव्यवस्था इत्यादी प्रस्थापित होत असल्याने साहित्यिक संहितेला पारंपरिक वा सांकेतिक बनविण्याची प्रवृत्तीही असते" (पृ. ९०).

साहित्यासंबंधीच्या हा विरोधाभास म्हणजे एखादा कूट प्रश्न किंवा श्रृंगापत्ती म्हणून मालशे यांनी हाताळलेला नाही. साहित्याच्या दृष्टीने एक अर्थपूर्ण आणि सर्जक असा ताण या विरोधाभासामुळे निर्माण होतो, आणि त्याचबरोबर अनेक संकल्पनांमध्ये समन्वय साधण्याची प्रक्रियाही त्यामुळे शक्य होते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर साहित्यासंबधीच्या वर उल्लेखिलेल्या विरोधाभासाच्या मालशे यांच्या मांडणीमुळे (ज्ञानविषयक सिद्धांतामध्ये आवश्यक मानल्या गेलेल्या) सुसंगतीच्या तत्त्वाचा शोध शक्य झालेला आहे, आणि या शोधामध्ये एक मर्यादित अशी विविधार्थता, त्याचप्रमाणे अर्थविवरणाच्या अनेक शक्यता (मात्र अनंत शक्यता नव्हेत) अनुस्यूत आहेत.

मालशे यांचे म्हणणे असे आहे की ई. ई. कमिंग्झ यांच्यासारख्या आधुनिक कवींच्या काव्यातील नियमोल्लंघन करणाऱ्या घटनांमुळे "गोंधळ वा दुर्बोधतेची भावना" निर्माण होत नाही, कारण या घटकांना तोलून धरतील अशी संरचनात्मक तंत्रेही या काव्यात वापरलेली असतात." (पृ. ९४) कमिंग्झ याच्याबरोबरच येथे अपोलीनेर, ह्यूडोब्रो, गट्रूड स्टेन, ऑडन आणि इतर अनेक लेखकांचा उल्लेख करता येईल. मालशे म्हणतात त्याप्रमाणे "सक्षम वाचकाला आंतरसंहितात्मक संबंधांचे प्रकारनिष्ठ किंवा वर्गीकरणनिष्ठ पैलू जाणवले की संहिता-संहितांमधील हे संबंध अत्यंत अर्थपूर्ण आणि वेधक ठरू लागतात." (पृ. ९६) मालशे यांनी वेगवेगळ्या पारंपरिक आणि आधुनिक वर्गीकरणव्यवस्थांचा चिकित्सक आढावा घेतलेला आहे आणि आधुनिक काळाला यथोचित अशी वर्गीकरणव्यवस्था रचताना कोणते संभाव्य धोके टाळायला हवेत याद्दृष्टीने विचार मांडलेले आहेत. डब्ल्यू. एच्. हडसन यांनी मांडलेली द्विविधव्यवस्था (व्यक्तिनिष्ठ साहित्यप्रकार विरुद्ध वस्तुनिष्ठ साहित्यप्रकार), नॉथ्रोप फ्राय यांची बहुकेंद्रीय व्यवस्था (चतुर्विध समीक्षाप्रकार आणि त्यांचे उपप्रकार), आणि पॉल हर्नाडि यांनी तयार केलेला साहित्यप्रकारांचा दिशादर्शक आराखडा, या साऱ्यांची आकृतीरूप मांडणी केल्यामुळे त्यांचे स्वरूप नजरेसमोर स्पष्टपणे उभे राहते. या सर्व व्यवस्थांच्या मर्यादा (उदाहरणार्थ, एकाच गोष्टीचे दोनदा नामकरण होणे, काही प्रकार महव्यापक होऊन बसणे, तिरके संबंध

अनुक्रमणिका

लक्षात न घेणे इत्यादी) यासुद्धा दाखवून दिलेल्या आहेत, आणि मुळात या साऱ्या प्रकारव्यवस्थांना संज्ञापनाच्या संकल्पनेचा पाया अजिबात नाही किंवा तो अगदी कच्चा आहे, व त्यामुळे हे दोष निर्माण झालेले आहेत, हेही स्पष्ट होते.

या सर्वांतून निघणारा निष्कर्ष असा की विट्गन्सटाइन याने मांडलेल्या कुलसाम्याच्या संकल्पनेवर आधारलेल्या कराराधिष्ठित (कॉन्ट्रॅक्चुअल) वर्गीकरणसिद्धांताकडे आपल्याला वळायला हवे. साहित्याच्या संज्ञापनप्रक्रियेमधील संदेश पाठविणारी व्यक्ती आणि संदेश ग्रहण करणारी व्यक्ती या कराराने बांधलेल्या असतात. 'कराराधिष्ठित वर्गीकरणसिद्धांत' म्हणताना येथे मांडणीमध्ये केवळ एक नवी संज्ञा वापरली आहे असे नव्हे तर येथे मुळात एक "संकल्पनात्मक प्रस्ताव" मांडलेला आहे. (पृ. १०४) व्युत्पत्तीच्या दृष्टीने पाहता "कॉन्ट्रॅक्ट" या शब्दामध्ये दोन घटकांना एकत्र आणण्याची प्रक्रिया अनुस्यूत आहे आणि त्यात एकत्र येणाऱ्या दोन्ही बाजूंची सहमतीही अभिप्रेत आहे. "त्यामुळे या संज्ञेच्या साहाय्याने संहितांना एकत्र आणण्याच्या प्रक्रियेकडे या संज्ञेमुळे लक्ष वेधता येते; वर्गीकरण म्हणजे केवळ जंत्री असे मानण्याच्या प्रवृत्तीवर हा एक उतारा ठरतो", असे मालशे दाखवून देतात. या संज्ञेचे मूळ सामाजिक कराराच्या सिद्धांतामध्ये आहे. वाचन ही एकदिशात्मक प्रक्रिया नसते हे या संज्ञेमुळे स्पष्ट होते. शेवटचा मुद्दा असा की लेखक आणि वाचक यांच्यामध्ये एखादा नैसर्गिक असा बंध असतो, ही कल्पना टाळायला या संज्ञेमुळे मदत होते. जे. एल्. ऑस्टिन आणि जॉन सर्ल यांच्या "त्या वाचिक कृतीं"च्या सिद्धांताशी या संकल्पनेचे नाते जोडता येते आणि त्यामुळे आपण संदर्भनिष्ठ विश्लेषणाच्या जवळ जातो व गैरलागू अमूर्तीकरण टाळता येते. मेरी लुइझी प्रॅट यांनी मांडलेल्या संदर्भनिष्ठ व्यवस्थेचा उल्लेख मालशे यांनी केलेला आहे; त्याबरोबरच फ्रान्समध्ये मेंगन्ते आणि इतर काहींनी सुचविलेल्या दिशांचा उल्लेखही करायला हवा. लजन यांच्या "पॅक्ट" या संकल्पनेची, त्याचप्रमाणे "कॉन्ट्रॅक्ट्स ऑफ फिक्शन" या संकल्पनेची सांगड मिलिंद मालशे यांच्या सैद्धांतिक विवेचनाशी घालणे हे तात्त्विक चर्चेला चालना देणारे ठरेल.

वर्णन (डिस्क्रिप्शन), प्रतिपादन (थीमटायझेशन) आणि विधिवत् सादरीकरण (रिच्युअलायझेशन) अशा तीन साहित्यिक भाषिक कृतींची मांडणी मालशे करतात. (- लेखकाच्या हेतूंचा विचार त्यांनी विवेचनात येऊ दिलेला नाही) या कृतींच्या आधारे साहित्यिक व साहित्येतर करारांची एक व्यवस्था उभी राहते व या करारांमधील समव्याप्त भागही लक्षात येतात. हे करार काही गुणधर्म, प्रक्रिया

आणि कार्ये यांनी युक्त असतात : १) ऐतिहासिक संहितांमध्ये वर्णनाचे मुख्य कार्य ज्ञानात्मक किंवा निर्देशात्मक असते, तर साहित्यिक संहितांमध्ये वर्णनाचे कार्य अंतर्गत सुसंगती असणाऱ्या एका शक्य अशा विश्वाची निर्मिती वा दृढीकरण करणे हे असते. २) तत्त्वज्ञानात्मक संहितांमध्ये प्रतिपादनाला युक्तिवादाचे पाठबळ मिळत असते; या उलट साहित्यिक संहितांमध्ये प्रतिपादन हे बव्हंशी अस्फुट असते आणि कथनांच्या विकासामधून ते सुचविले जात असते. ३) साहित्यिक संहितांमध्ये भाषिक पोत प्रधान ठरतो तर विधिवत् सादरीकरणाचे पैलू गौण ठरतात; याउलट धार्मिक वा इतर विधींच्या बाबतीत विधिवत् सादरीकरण हे प्रधान असते तर पाठ्याचा पैलू केवळ साथ करणारा व म्हणून गौण असतो. या भेदव्यवस्थेमध्ये अधिक सूक्ष्मता येणे अर्थातच आवश्यक आहे. विशेषतः विधिवत् सादरीकरणाच्या बाबतीत असे म्हणता येईल की, आज ख्रिस्ती धर्माच्या शब्दप्रधान विधींबरोबरच (ख्रिस्ती लिटर्जी) इस्लाममधील संहितानिष्ठ धर्मविधी, त्याचप्रमाणे काही पुरातन असे हावभावांवर आणि शब्दांवर आधारलेले विधीही अस्तित्वात आहेत. मात्र मालशे यांची करारांची मूळ संकल्पना सशक्त असल्यामुळे "अस्पष्ट सीमारेषा, सहव्याप्ती आणि उलथापालथ" यांच्याविषयी त्यांनी जे अखेरचे प्रकरण लिहिले आहे त्यात प्रत्यक्षपणे तसेच अप्रत्यक्षपणेसुद्धा ही संकल्पना त्यांना चांगली खेळविता आली आहे.

आधुनिक दृष्टिकोनातून विचार करता 'सांगणे', 'दाखविणे', 'प्रतिपादन करणे' आणि 'भावविणे' या चार प्रकारच्या परस्परप्रक्रियांमधून चार मूलभूत साहित्यिक करार निर्माण होतात. हे करार म्हणजे कथनात्म, नाट्यात्म, प्रतिपादनात्म आणि भावकाव्यात्म करार होत. लिरिकल बॅलड्झ् या काव्यसंग्रहातील "राइम ऑफ दि एन्शंट मॅरिनर' या कोलरिजच्या कवितेच्या विश्लेषणामधून मालशे यांनी महाकाव्याचा कथनात्म करार आणि भावकाव्यात्म करार यांतील भेदतत्त्वे स्थल व काल या दोन मूलभूत मितींच्या साहाय्याने दाखवून दिली आहेत. मालशे यांनी असे विश्लेषण केलेले आहे की कोलरिजच्या या कवितेमध्ये कथनात्म भूतकाळाचा वापर करून एक कथनात्मक चौकट निर्माण केली जाते आणि त्याचबरोबर भावकाव्याच्या कालातीततेचाही वापर येथे होतो. दुसरे म्हणजे भावकाव्यात जो आवाज ऐकू येतो तो स्वतःलाच उद्देशून संज्ञापन करीत असतो किंवा अनुपस्थित अशा व्यक्तीला संबोधीत असतो, कारण या प्रकारामध्ये संदेश ग्रहण करणारी व्यक्ती प्रत्यक्षात अस्तित्वात नसते तर केवळ एक आडून ऐकणारी

साक्षीदार असते. याउलट कथनामध्ये एक ऐकणारी व्यक्ती अध्याहृत असते. भावकाव्याचे मूल्यमापन करीत असताना जे प्रश्न वाचक या घटकाकडून उपस्थित केले जातात ते प्रश्न कथनाच्या मूल्यमापनात उपस्थित होत नाहीत. वर्डस्वर्थ याच्या ल्यूसीवरील शोककवितेच्या (She dwelt among the untrodden ways) संदर्भात ल्यूसीचा जन्म कधी झाला, तिचा मृत्यू कधी झाला, तिच्या अल्पायुष्यातील अज्ञात अशा घटना कोणत्या, या प्रकारचे प्रश्न वाचक विचारीत नाही. जीवन व मरण, उपस्थित असणे आणि नसणे यांमध्ये या कवितेमध्ये एक प्रकारचे सातत्य दर्शविलेले आहे. संबोधनाची प्रक्रिया किंवा उद्देशिकेचे तत्त्व भावकाव्याचे गाभ्याचे तत्त्व असते. हॉपकिन्झ या कवीच्या काव्यात हे स्पष्टपणे दिसते; आर्चिबाल्ड मॅक्लीश या कवीने कवितेमधूनच (Ars Poetica या कवितेमध्ये) या तत्त्वाची मांडणी केलेली आहे. हॅम्लेटसारखे नाटक वाचताना "हॅम्लेट इंग्लंडमध्ये परत आल्यावर काय होते?" यासारखे कथानकविषयक प्रश्न उपस्थित केले जातात. याउलट नाट्यात्म करारामध्ये घटना आणि पात्रे यांच्या अधेमधे कोणत्याही आवाजाला स्थान नसते : "पात्रांच्या कृती आणि भाषणे यांतून घटनाविश्व साकार होते आणि ते प्रेक्षकांपुढे त्याच रूपात सादर होते". (पृ. ११९) कालपरिमाणाचा विचार करता नाट्यात्म करारामधील काल कथनात्म भूत नसतो. किंवा (भावकाव्याचा) कालातीत वर्तमानही नसतो; येथे संवादांमध्ये जे निर्देशक शब्द असतात त्यांच्यामुळे घटना घडणे आणि (रंगमंचावर) त्यांचे सादरीकरण होणे या गोष्टी एकाचवेळी साधल्या जात असतात. ॲरिस्टॉटलप्रणित मिथक (mythos) या संकल्पनेमध्ये मात्र विचार, विषयसूत्र किंवा मांडणीचा आशय या घटकांचे कार्यही मान्य केले पहिजे, कारण साहित्यप्रकार हे भाषिक प्रयोगांचेच प्रकार असतात. रूपकनिष्ठ साहित्य प्रकारांमध्ये (ॲलेगरी) विचार महत्त्वाचे असले तरी त्यांचे काल्पनिक विश्व एकतर कथनरूपात अवतरते किंवा नाट्यरूपात अवतरते. परंतु निबंध या प्रकारामध्ये तसे होत नाही. या प्रकारामध्ये वैचारिक मांडणी महत्त्वाची असते आणि त्यामुळे त्यांना सामावून घेणाऱ्या आणखी एका कराराची मांडणी आवश्यक ठरते. हा करार म्हणजे मुद्दे मांडण्याचा किंवा प्रतिपादनाचा करार होय. वैचारिक वा युक्तिवादात्मक प्रतिपादन निबंधामध्ये होत असताना किस्से, कबुलीजबाब, इत्यादी आनुषंगिक घटकही येऊ शकतात. (उदाहरणार्थ मोंतेन याचे लेखन पहा.) निबंधामध्ये हे सर्व घटक विषयसूत्राने नियंत्रित झालेले असतात. चतुर्विध करारव्यवस्थेची मांडणी करीत असताना मालशे यांनी इतर तीन करारांचे

ज्या प्रकारे विवेचन केले आहे त्याच धर्तीवर निबंधाच्या प्रतिपादनात्मक करारचेही त्यांनी विवेचन करायला हवे. विशेषतः या करारामध्ये स्थलकालपरिमाणे कशी वापरली जातात आणि संबोधनात्मक घटक कसे वापरले जातात, असे दोन प्रश्न त्यांनी विचारात घ्यायला हवेत. या प्रश्नांची चर्चा झाली की त्यामुळे त्यांच्या करारव्यवस्थेच्या मांडणीला पूर्णत्व येईल.

मालशे यांची ही करारव्यवस्थेची मांडणी काहीशी जंत्रीवजा वाटण्याचा धोका होता आणि त्यामुळे ती काहीशी असमाधानकारक ठरली असती. परंतु तसे झालेले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांनी समारोपाच्या प्रकरणामध्ये साहित्य प्रकारांमध्ये घडणाऱ्या परस्परप्रक्रिया, त्यांचे मिश्रण, त्यांचे अस्थिरीकरण आणि पुनर्बांधणी यांची चर्चा तीन प्रकारच्या उदाहरणांच्या साहाय्याने केलेली आहे. पहिली दोन उदाहरणे नाट्याच्या करारची आहेत. या करारामध्ये कथनात्मक आणि प्रतिपादनात्मक घटक कसे येऊ शकतात याची चर्चा (बर्नार्ड शॉ यांच्या नेपथ्य-सूचना आणि बेकेट यांच्या नाटकांमधील संवादांमधून स्थलकालाची परिमाणे अदृश्य होणे या उदाहरणांची चर्चा); तिसरे उदाहरण कथनामध्ये भावकाव्यात्म घटक कसे येऊ शकतात याचे आहे. (व्हर्जिनिया वुल्फच्या कादंबऱ्यांमध्ये हे कसे होते याची चर्चा आहे) या शक्यतांमध्ये तत्त्वतः आणखीही भर घालता येईल. (आणि स्थिर झालेल्या करारांच्या अटी परस्परांशी कशा संबंधित आहेत याची कोष्टकाच्या रूपात मांडणीही करता येईल) : उदाहरणार्थ, कथनाचे नाट्यीकरण (आयव्ही कॉम्प्टन-बर्नेट यांचे उदाहरण घेता येईल), किंवा भावकाव्याचे नाट्यीकरण (क्लोदेल यांच्या लेखनामध्ये), किंवा प्रतिपाद्य आशयाचे कथन (केवळ रूपककथांमध्येच नव्हे तर दृष्टांतकथांमध्येही). मालशे यांनी चर्चिलेल्या चार करारांबरोबरच आणखी एका समस्यानिष्ट, गूढवाचक किंवा प्रश्नार्थक करारची मांडणी करता येईल का, हेही तपासायला हवे. : हा करार सूचक, दर्शक, कथनात्मक आणि प्रतिपादनात्मक घटकांनी युक्त असेल आणि भूतकाळाची आणि भविष्यकाळाची गूढे त्यात मांडलेली असतील (मनोविश्लेषणात्मक साहित्य आणि विज्ञाननिष्ठ साहित्य, ही त्याची उदाहरणे होत).

मालशे यांची मांडणी मुळात अपुरी आहे किंवा त्यांनी आपल्याशी केलेला "करार" पाळलेला नाही, असा याचा अर्थ नाही, उलट त्यांच्या विवेचनात विश्लेषण आणि संश्लेषण करण्याची जी दुहेरी क्षमता दिसते ती स्फूर्तिदायक आहे. त्यांच्या छोटेखानी मांडणीमुळे त्यांच्या सिद्धांतनावर ज्या मर्यादा पडलेल्या आहेत त्या

ोलांडण्यासाठी आणि त्यांनी दाखविलेल्या संशोधनात्मक दिशांचा पाठपुरावा ाधिक व्यापक प्रमाणावर होण्यासाठी ही स्फूर्ती उपयोगी पडेल. आणखी एक मुद्दा थे मांडायला हवा. तेल अवीव प्रणालीच्या सिद्धांताशी, विशेषतः इतामार इव्हन ोहर यांच्या सैद्धांतिक लेखनाशी, मालशे परिचित नसावेत असे त्यांच्या लेखनावरून ासते. या लेखनाशी मालशे यांनी केलेल्या सैद्धांतिक संश्लेषणाची सांगड घालणे ात्यंत उपयुक्त ठरेल.

ीप : मूळ परीक्षण फ्रेंचमध्ये दिदेर कोस्त, फ्रान्समधील बोर्दो विद्यापीठातील लनात्मक साहित्याभ्यासाचे प्राध्यापक, यांनी fabula.org या साहित्यसिद्धांताला ाहिलेल्या वेब - नियतकालिकामध्ये सप्टेंबर, २००३ मध्ये प्रसिद्ध केले. त्याचे राठी भाषांतर प्रा. जयंत धुपकर (सी.आय.ई.एफ.एल., हैद्राबाद) यांनी केले ाहे. डॉ. श्री. मा. भावे (तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ) यांनी केलेल्या इंग्लिश ाषांतराचेही साहाय्य झाले.]

■

सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंग्लिश अँड फॉरिन लँग्वेजिझ्, हैद्राबाद- ५०००००७

समस्या की संधी ?

ज्या बायकोचा मान नवरा राखत नाही किंवा ज्या मालकाचा मान त्याचे कर्मचारी राखत नाहीत, त्या बायकोची किंवा त्या मालकाची बाहेरच्या जगातही कुणी किंमत राखत नाही, हे आपण बघतोय. तेव्हा आपल्या मातृभाषेचा व संस्कृतीचा मान आपण ठेवला, तर बाहेरच्या जगातही त्यांना मान्यता मिळेलच. एकविसाव्या शतकातील जागतिकीकरणाच्या या उसळत्या लाटेत महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र हा भेद पुसला जाणार असून 'जागतिक महाराष्ट्र' ही नवी संकल्पना मूळ धरणार आहे. महाराष्ट्र तसेच बृहन्महाराष्ट्रात वाढत असलेली, या भाषा व संस्कृतीच्या संघर्षामुळे संभ्रमित झालेली नवीन पिढी व कासावीस झालेली आमच्यासारखी जुनी पिढी... आम्ही सर्वच या संघर्षाकडे गहन समस्या म्हणून न बघता अफाट संधी म्हणूनही बघू शकतो. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांवर तितकेच प्रभुत्व जर आम्ही मिळवले तर घरटं शाबूत ठेवून आम्ही निळ्या आभाळाच्याही आरपार जाऊ शकतो.

■

अनुराधा गानू (लोकसत्ता ११.०९.०४)

क्रियापद - शब्दांचा राजा!

डॉ. गीता भागवत

परवा कपाटाची आवराआवर करताना जुन्या जीर्ण कागदांचे एक पुडके मला सापडले. उघडून वाचायला लागले आणि एक अनमोल रत्नच सापडल्याचा मला आनंद झाला. "द व्हर्ब इज द वर्ड" या शीर्षकाचा तो लेख - केमिकल टेक्नॉलॉजीच्या एका जर्नलमध्ये बऱ्याच वर्षांपूर्वी आलेला! तो लेख माझ्याकडे आला हे खरेतर माझे मोठे सद्‌भाग्य. सुमारे ८-१० वर्षांपूर्वीची म्हणजे १९९४-९५ची गोष्ट आहे. १९८० पासून धूळ खात पडलेल्या माझ्या प्रबंधाचे पुस्तकात रुपांतर करण्याचा योग राज्य मराठी विकास संस्थेच्या कृपेने आलेला होता. त्यासाठी प्रबंधाचे पुनर्लेखन करण्याचे काम मी करीत होते. त्याच कामाच्या संदर्भात मी नागपूरहून मुंबईला येऊन मुलाकडे ४-८ दिवस मुक्काम केला होता. त्याच दिवसात माझी केमिकन इंजिनियर असलेली तमिळभाषक सून तिच्या पीएच. डी. साठी मुंबई विद्यापीठात संशोधन करीत होती. भाषेची दुर्बोधता वस्तुनिष्ठपणे जोखण्याचे एक गणिती सूत्र मी माझ्या प्रबंधात मांडले आहे असे मी तिला सहज सांगितले. कठीण शब्दांचे शेकडा प्रमाण, वाक्याची सरासरी लांबी वगैरे सूत्राचे तपशील मी तिला सांगत होते. क्षणभर तिचे डोळे चमकले आणि ती मला म्हणाली, "आमच्या 'केमटेक' या इंग्रजी वैज्ञानिक मासिकातपण भाषेच्या सुबोधतेच्या संदर्भात एक लेख आल्याचं मला आठवतंय. तुमच्या सूत्रापेक्षा अगदी सोपं मजेशीर सूत्र त्यात सुचवलंय एकानं!"

त्यावेळी कामाच्या गर्दीत तो विषय तिथेच थांबला. नंतर काही महिन्यांनी मी पुन्हा मुंबईत आले होते तेव्हा एक दिवस माझी सून त्या लेखाची छायाप्रतच माझ्यासाठी घेऊन आली. त्यावेळेपर्यंत माझ्या पुस्तकाचे काम माझ्याकडून हातावेगळे झालेले होते आणि म्हणून मग नंतर सवडीने वाचू असे ठरवून मी तो लेख ठेवून दिला... मग ती सवड मला कधी मिळालीच नाही. माझी ती सून बाळंतपणानंतर अति रक्तस्त्रावाने वारली; तिचे चार तासांचे बाळ माझ्या मांडीवर आले आणि ते सगळे संशोधन, लेख वगैरे माझ्या पार विस्मरणात गेले. आज इतक्या वर्षांनी असा अचानक तो लेख माझ्या हाती आला. तो मी मन लावून वाचला आणि थक्कच झाले. भाषा विज्ञानाची असंख्य पुस्तके मी पीएच. डी. संशोधनकाळात

वाचली होती, पण असे साधे सूत्र मला कुठे आढळले नव्हते. आणि कौतुकाची गोष्ट अशी की हे अभिनव सुटसुटीत सूत्र मांडणारी व्यक्ती कुणी भाषा वैज्ञानिक नव्हती. रेमंड रॉजर्स नावाच्या एका सिनियर रिसर्च केमिस्टने ते सूत्र तयार केले होते. अमेरिकेतल्या एका मोठ्या कंपनीत ३०-३५ वर्षे वेगवेगळ्या उच्च पदांवरून प्रयोगशाळांत शास्त्रीय संशोधनाचे काम त्याने केलेले होते. त्यानंतर त्याच्याकडे काम आले होते वेगवेगळ्या तांत्रिक अहवालांचे संपादन करण्याचे. हे काम करीत असतानाच तो त्या लिखाणातील भाषा सुबोध करण्याच्या पद्धतीबद्दलही, भाषा सुधारण्याबद्दलही अभ्यास करीत असे. आपल्या परिशीलनामधून त्याने एक तत्त्व मांडले होते : लिखाणातील क्रियापदे व इतर शब्द यांच्या परस्पर प्रमाणाबद्दलचे! सुबोधता आणि वाचनीयता यांच्याबाबतचे त्याचे ते विचार भाषेच्या अभ्यासकांनी व भाषाप्रेमींनी अवश्य विचारात घ्यावे असे आहेत. म्हणून त्या लेखाचा हा थोडक्यात परिचय.

लेखाचे शीर्षक आहे - The verb is the word! वाक्यातील सगळ्यात महत्त्वाचा, कळीचा शब्द कोणता? तर त्यातील क्रियापद! जणू शब्दांचा राजाच. रॉजर्स सांगतो, मजकुरातील एकूण शब्दांमध्ये क्रियापदांची संख्या जेवढी अधिक तेवढा तो मजकूर समजायला सोपा. आपलं म्हणणं उदाहरणे देऊन तो स्पष्ट करतो. आता त्याने दिलेले हे वाक्य पहा -

१(अ) A literature search was made for background information on the low volume conversion of field available water supplies of unacceptable purity into purified water.

वाचलेत हे वाक्य? या वाक्याचे काहीतरी बिनसले आहे असे नाही वाटत तुम्हाला? अर्थ समजला का चटकन? एकदा वाचून समजला की दुसऱ्यांदा वाचावे लागले? हे वाक्य अर्थ समजण्याच्या दृष्टीने अवघड मानाल की सोपे? बहुतेक जणांना वाक्याचा अर्थ वाचताक्षणी समजलेला नसणार! पुन्हा एकदा वाचून पाहूया असे मनाशी म्हणत दुसऱ्यांदा वाचावे लागले असणार. रॉजर्स म्हणतो, आपण हे वाक्य असे लिहिले तर?

१(आ) We searched the literature for background information that might show how small volumes of impure field water can be purified.

वाक्य क्र. १ (अ) पेक्षा दुसऱ्यांदा लिहिलेले वाक्य क्र. १ (आ) झटकन

समजलेना? तुमच्या लक्षात आलेच असेल की या वाक्य क्र. १ (आ) मध्ये क्रियापदांची संख्या अधिक आहे. वाक्य क्र. १ (अ) मध्ये was made हे एकच क्रियापद आहे तर वाक्य क्र. १ (आ) मध्ये searched, might show आणि can be purified अशी तीन क्रियापदे आहेत.

वाक्य क्र. १ (अ) लिहिणारी व्यक्ती क्रियापद वापरात कंजुषी करणारी आहे. क्रियापदांचा हात राखून वापर करण्याच्या या प्रवृत्तीमुळे लेखनातील वाक्ये अर्थ सहज व्यक्त करण्यात अपेशी ठरतात. वाक्याची सुबोधता वाढवायची असेल तर आपण क्रियापदांचा भरपूर वापर करायला हवा.

रॉजर्स म्हणतो, व्याकरणाच्या परिभाषेत बोलायचे तर सगळीच केवल वाक्ये कमी लांबीची (कमी शब्द संख्येची) असतात असे नाही. तसेच सगळीच संयुक्त वा मिश्र वाक्ये जास्त लांबीची (अधिक शब्द संख्येची) असतात असेही नाही. काही मिश्र / संयुक्त वाक्ये छोटीही असतात आणि काही केवल वाक्येही मोठमोठी असतात.

रॉजर्सच्या असे लक्षात आले की काही काही लेखकांना आपली वाक्ये 'केवल' स्वरूपाचीच लिहिणे आवडते. त्यांना व्यक्त करायचा अर्थ कितीही गुंतागुंतीचा असो, ते संयुक्त किंवा मिश्र वाक्य लिहिण्याऐवजी केवल वाक्यच लिहिणार. क्रियापद फक्त एकच वापरणार, मग वाक्य कितीका शब्दसंख्येचे होईना! आणि अशी अतिदीर्घ केवल वाक्ये वाचून वाचूनच त्याला क्रियापदांची किंमत कळायला लागली. लेखन दुर्बोध करून टाकणारा सगळ्यात मोठा रोग म्हणजे क्रियापदांची कमतरता हे रॉजर्सने ओळखले. मजकुरातील क्रियापदांची संख्या आणि क्रियापदेतर शब्दांची संख्या यांच्या गुणोत्तरावरून, परस्पर-प्रमाणावरून मजकुराची सुबोधता ठरवता येते हे त्याच्या लक्षात आले. मग त्याने वाक्याची सुस्पष्टता स्थूलपणे ठरविण्यासाठी मोजमापाचे एक सूत्रच तयार केले, ते असे :

क्रिशप्र = क्रि/श (VWR = V/W)

(येथे, क्रि (V) = क्रियापदांची संख्या,

श (W) = क्रियापदेतर शब्दांची संख्या

क्रिशप्र (VWR) = क्रियापद - क्रियापदेतर शब्द यांचे प्रमाण.)

म्हणजेच जितकी क्रियापदे जास्त तेवढे लिखाण जास्त सुस्पष्ट, सुबोध! पुढे तो असेही म्हणतो की, किमान १/१० एवढे गुणोत्तर (परस्पर-प्रमाण) हवे. ते वाढेल तसेतसे लिखाण सुबोध होत जाईल. दुसऱ्या शब्दांत, एक क्रियापद दहा शब्द

सहज पेलू शकेल. क्रियापद - क्रियापदेतर शब्दांचे हे परस्पर-प्रमाण १ : १० म्हणजेच १/१० ऐवजी १ : २० म्हणजेच १/२० असे झाले की लिखाण दुप्पट दुर्बोध झाले. सुबोधता निम्मी झाली.

रॉजर्सचे म्हणणे असे की, विषय कठीण असला, संकल्पना नवीन असली, तांत्रिक किंवा गुंतागुंतीची असली तर नवे, अनोळखी आणि उच्चारायला व वापरायला कठीण असे काही शब्द येणे अटळच! विषयतज्ज्ञांना ते त्यांच्या ज्ञानामुळे, सरावामुळे कळतील आणि इतर गरजू आपल्या प्रयत्नांनी ते समजून घेतील. पण टाळता येण्याजोगा भाषेचा बोजडपणा तरी आपण नक्की टाळू शकू. क्रियापदे भरपूर वापरली की झाले!

एखाद्या मजकुराची दुर्बोधता - बोजडपणा पडताळायचा असला तर आपण काय करायचे? त्यातली वाक्ये मोठी असोत वा छोटी, वाक्यातील शब्द कठीण (अनोळखी, बहुअक्षरी, जोडाक्षरी) असोत वा सोपे (ओळखीचे, अल्पाक्षरी, जोडाक्षरविरहित), आपण त्या गोष्टींचा विचार करायची गरजच नाही. एकूण शब्द किती आणि क्रियापदे किती, हे पहायचे आणि क्रियापदे - क्रियापदेतर शब्द यांचे परस्पर प्रमाण पहायचे की झाले!

रॉजर्स आपल्या म्हणण्याच्या पुष्टीसाठी एक उदाहरण देतो. तेलविहिरी खणण्यातील अडचणींबद्दलच्या एका लेखातील हे वाक्य पहा.

२(अ) Impairment of the injection permeabillity of the producing formation occurs during the process of drilling with a water-base fluid as a rsult of filter cake buildup on the wellbore surface and invasion of clay particles from the drilling fluid into the pore spaces of the formation. (क्रिशप्र = १/४६)

हे वाक्य क्रियापदांची संख्या वाढवून तो पुनः लिहून काढतो ते असे :

२(आ) When producing formation is drilled with a water-base fluid, its injection permeability is impaired by the filter cake that is built up on the wellbore surface, and by clay particles from the drilling fluid that invade the pore spaces of the formation (क्रिशप्र = ४/३९ = १/१०)

वाक्य क्र. २(आ) या वाक्यात रॉजर्सने मुळातल्या सर्व तांत्रिक - शास्त्रीय संज्ञा कायम ठेवल्या आहेत. तसेच, विषयाचा कठीणपणा आणि अर्थाची गुंतागुंत

ही देखील कायम आहे. पण तरीही दुसरे वाक्य समजायला तुलनेने सोपे वाटते. असे का झाले? याचे रॉजर्सचे स्पष्टीकरण असे की या मजकुराच्या अवघडपणाची दोन अंगे आहेत. एक म्हणजे अर्थातच अवघड विषय आणि दुसरे तो सांगण्याची पद्धत. यापैकी विषयाचा अवघडपणा आणि त्यातले तांत्रिक शब्द व अर्थाची संमिश्रता हे सगळे बदलणे शक्य नाही. पण वाक्यरचनेत बदल करायला नक्की वाव आहे. जमेल तेथे नामे, विशेषणे यांच्या ऐवजी क्रियापदे वापरायची म्हणजे भाषा सोपी होईल, अर्थाचे आकलन सुलभतेने होईल. मला वाटले, वाक्य क्र. २ (आ) मध्ये क्रियापदांची संख्याच फक्त वाढवली आहे : एकाऐवजी चार क्रियापदे वापरली आहेत. एकूण शब्दसंख्या ४६ वरून ३९वर आणली आहे हे खरे पण वाक्य एकच ठेवले आहे. थोडे पुढे जाऊन त्याने छोटी छोटी दोन वाक्ये केली असती तर? मी मग तसे करून तोच मजकूर असा लिहिला :

२(इ) When the producing formation is drilleed with a water-base fluid, filter cake is built up on the wellbore surface and the pore spaces of formation are invaded by the clay particles from the drilling fluids. As a result, its injection permeability is impaired.

मराठी भाषेतही मजकूर सुबोध करण्यासाठी एका मोठ्या वाक्याची छोटी - छोटी वाक्ये किंवा पोटवाक्ये करण्याची युक्ती आपल्याला नेहमीच उपयोगी पडते. प्रत्येक छोट्या वाक्याचे किंवा छोट्या पोटवाक्याचे वेगळे क्रियापद! यामुळे क्रियापदांची संख्या आपोआपच वाढते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, अर्थाच्या सुलभ आकलनासाठी क्रियापदांचा भरपूर वापर करावा हे रॉजर्सचे इंग्रजी भाषेच्या बाबतचे सूत्र मराठी भाषेलाही तेवढेच लागू पडते. उदाहरणच घेऊ या ना!

३(अ) 'उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भित पृष्ठांकनाबाबत कळवण्यात येते की, चालू वित्तीय वर्षाची अखेर जवळ येत असल्याने तसेच चालू वित्तीय वर्षात खर्चाची काटकसर करण्याच्या धोरणानुसार शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून नवीन पदे निर्माण करण्यावर बंदी घालण्यात आल्याने संबंधित महाविद्यालयांसाठी चौथ्या श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या जागा निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव स्थगित ठेवावा.'

(एक वाक्य - एकूण शब्द ४५ - क्रियापदे २)

क्रिशप्र = २:४३ = १:२१.५ = १:२२

३(आ) 'उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भित पृष्ठांकनाबाबत

कळविण्यात येते की, संबंधित महाविद्यालयांसाठी चौथ्या श्रेणीच्या कर्मचाऱ्यांच्या जागा निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव स्थगित ठेवावा. कारण, चालू वित्तीय वर्षाची अखेर जवळ येत आहे आणि चालू वित्तीय वर्षात खर्चाची काटकसर करण्याचे शासनाचे धोरण आहे. यामुळे, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने नवीन पदे निर्माण करण्यावर बंदी घातली आहे.'

(तीन वाक्ये - एकूण शब्द ४९ - क्रियापदे ५)

क्रिशप्र = ५:४४ = १:८.८ = १:९

एका लांबलचक वाक्याची तीन स्वतंत्र वाक्ये केली आहेत. त्यांपैकी पहिल्या व दुसऱ्या वाक्यात प्रत्येकी २-२ पोटवाक्ये आहेत. परिणामी, क्रियापदसंख्या ३ वरून ५ वर गेली आहे. एकूण शब्दसंख्या ४५ ऐवजी ४९ झाली असली म्हणजे ४ ने वाढली असली तरी क्रियापद - क्रियापदेतर शब्दांचे प्रमाण १:२२ वरून १:९ असे झाले आहे. एका क्रियापदावरील ओझे २२ शब्दांवरून ९ शब्दांवर आले आहे. यामुळे अर्थ नक्कीच लवकर समजतो आहे.

रेमंड रॉजर्सचा तो लेख वाचून मी बाजूला ठेवला आणि माझ्या पीएच. डी. चा प्रबंध आणि त्यातले सूत्र माझ्या मनात नाचायला लागले. प्रशासनिक मराठीच्या दुर्बोधतेबाबत मी सविस्तर अभ्यास केला आणि त्यानंतर तेव्हापासून गेली २५ वर्षे मी तळमळीने सांगत आले की भाषा सोपी करायची असेल तर दोन गोष्टी करा. पहिली, कठीण शब्द - म्हणजे जोडाक्षरी व बहुअक्षरी शब्द - कमीतकमी वापरा. आणि दुसरी, शब्द सोपे - म्हणजे अल्पाक्षरी व जोडाक्षर विरहित वापरणे जमले नाही तर निदान वाक्ये छोटी छोटी करा. दुर्बोधता वस्तुनिष्ठपणे जोखण्यासाठी मी तयार केलेले सूत्र वापरायचे तर ३-४ टप्पे पार पाडावे लागतात. आधी एकूण शब्द मोजायचे. मग कठीण शब्द मोजायचे (त्यासाठी कठीण शब्दांचे नियम समजून घ्यायचे) आणि कठीण शब्दांचे शेकडा प्रमाण काढायचे. मग एकूण वाक्ये मोजायची आणि वाक्यांची सरासरी लांबी काढायची. शेवटी शेकडा प्रमाण आणि सरासरी लांबी यांच्या बेरजेला विशिष्ट आकड्यांनी गुणायचे व दुर्बोधता निर्देशांक काढायचा. तो ठराविक मर्यादेपेक्षा जास्त असला तर कमी करण्यासाठी कठीण शब्द कमी करून सोपे पर्याय वापरायचे आणि वाक्ये छोटी करायची! कोण हा द्राविडी प्राणायाम! या सगळ्या गणिती आकडेमोडीचा व भाषिक खटाटोपाचा खूप बागुलबुवा वाटतो आणि त्यामुळे ते सूत्र वापरायला गैरसोयीचे वाटते असे मला काही जणांकडून ऐकायला मिळाले. खरे तर, शेकडेवारी, सरासरी, बेरीज व गुणाकार या अगदी

अनुक्रमणिका

प्राथमिक शाळेतल्या अंकगणितातील क्रिया. मूळ शब्द व सामान्यरूप आणि शब्दांचे प्रत्यय यांचे ज्ञानही व्याकरणाच्या प्राथमिक स्वरूपात पण सराव नसल्यामुळे तेही अवघड वाटणाऱ्या व्यक्तींना तांत्रिक लिखाणाचे, वैचारिक मजकुराचे लेखन - संपादन करताना रॉजर्सचे हे सोपे तत्त्व तरी पाळता येईल की नाही? फक्त क्रियापदे जास्तीत जास्त वापरायची. वाक्ये आणि पोटवाक्ये आपोआप छोटी होतील. अर्थआकलन सुलभ होईल. भाषेच्या दुर्बोधतेच्या विरुद्धची अर्धी लढाई तरी विनासायास जिंकता येईल.

काटेकोरपणे आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने व शास्त्रशुद्ध रीतीने मजकुराची दुर्बोधता जोखायची असेल, सुबोधतेच्या पडताळणीनंतर त्याची प्रतवारी लावायची असेल तर माझे सूत्र वापरणे भागच आहे. एखाद्या सुबोधताचाचणी-केंद्रात किंवा दुर्बोधताउपचार-केंद्रात तेच उपयोगी पडेल. पण ढोबळमानाने भाषेचा सोपेपणा साधायचा असेल तेथे रॉजर्सची ही क्रियापदांच्या सढळ वापराची युक्ती नक्की वापरता येईल. भाषाप्रेमींनी ती जरूर वापरून पहावी.

संदर्भ - १. प्रशासनिक मराठी भाषेचा विकास - डॉ. गीता भागवत, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, १९९६.

२. विद्यापीठ प्रशासनाचे मराठीकरण - डॉ. गीता भागवत, सारंग प्रकाशन, मुंबई ५७, २०००.

३. The verb is the word! - रेमंड रॉजर्स, 'केमटेक' - मार्च १९८८.

■

९, रानडे कॉटेज सोसा., परांजपे बी स्कीम, तिसरा रस्ता, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७

सामासिक शब्द

इंग्रजीच्या प्रभावामुळे सामासिक शब्द म्हणजे काय हे आम्हां मराठीभाषकांना समजेनासे झाले आहे. गेल्या दोन पिढ्यांपासून त्या बावतीत सर्वत्र आनंदी-आनंद आहे. पाठ्यपुस्तकनिर्मितीमंडळ, महाराष्ट्रराज्यविद्युन्मंडळ असे शब्द आपण लिहावयास पाहिजेत - पण ते तर असोच, उद्घाटनसमारंभासारखे साधे शब्द सुद्धा आम्ही तोडून लिहितो. ■

दिवाकर पुरुषोत्तम मोहनी, 'आजचा सुधारक', १५.६

महाविद्यांलयाच्यां कार्यालयातील भाषा - उपयोजन

एकनाथ पगार

मानवी जीवनव्यवहारात माध्यम म्हणून भाषेचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. भाषेमुळे व भाषेतून आपण परस्परांशी जोडले जातो किंवा तोडलेही जातो. ही जोडतोड करण्याचे माध्यम भाषा असते. भाषा या माध्यमाचे स्वरूप जीवनक्षेत्रनिहाय बदलत असते. काळ, व्यक्ती, परिस्थिती वगैरेनुसार भाषा बदलताना दिसते. पोलीस स्टेशन, न्यायालय, शासकीय कार्यालय, आठवडे बाजार, विवाहसमारंभ, एस. टी. स्टँड अशी क्षेत्रे घेतली तरी आपल्या लक्षात येईल की प्रत्येक क्षेत्रातील भाषाव्यवहारात सूक्ष्म बदल होतो. आपण व आपल्याशी संबंधित क्षेत्रात होणारी भाषिक देवघेव क्षेत्रानुसार बदलते, हे लक्षात घेऊनच आपण भाषा व्यवहाराचे स्वरूप ठरवितो. ही क्रिया सहजगत्या होत असली तरी ती भाषेच्या बाबतीत खास क्षेत्रक्रिया असते. येथे आपण महाविद्यालयाच्या कार्यालयात होणाऱ्या भाषाउपयोजनाचा विचार करणार आहोत.

महाविद्यालयाच्या कार्यालयात लेखी व तोंडी असा भाषाव्यवहार एकाच वेळेस सुरू असतो. शिक्षक, विद्यार्थी, प्राचार्य, पालक आदींशी प्रत्यक्ष संवाद साधावा लागतो. विद्यापीठ, उच्चशिक्षण संचालनालय, विद्यापीठ अनुदान आयोग व इतर सामाजिक - शैक्षणिक संस्थांशी लिखित भाषाव्यवहार होत असतो. कार्यालयीन कामासाठी विविध सामाजिक घटक संपर्क साधतात, प्रसंगानुसार शिक्षकेतर कर्मचारी वर्गासही बाह्य घटकांशी संपर्क साधावा लागतो. विद्यार्थी हाच या सर्व प्रक्रियेत केंद्रस्थानी असतो. विद्यार्थी व त्याअनुषंगाने होणारे शैक्षणिक व्यवहार महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी करत असतात. हा व्यवहार सामान्यतः मराठी भाषेतून चालतो. हिंदी व इंग्रजी यांचा वापरही करावा लागतो. ग्रामीण भागात तर बहुसंख्य पालकांशी व इतर समाजघटकांशी स्थानिक बोलीतून संवाद साधावा लागतो. विद्यार्थीही बोलीतूनच संवाद करण्यास उत्सुक दिसतात. दुर्गम व वाड्यापाड्यातून येणारे विद्यार्थी आपापसात बोलींचा वापर करताना दिसतात. म्हणजेच महाविद्यालयाच्या परिसरात बोली ते आधुनिक भाषांमधून शैक्षणिक व्यवहार होत असतात.

नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजीतून भरावयाचे फॉर्म्स, इ. बी. सी. सवलतीचे फॉर्म्स, पात्रतासिद्धतेचा फॉर्म वगैरे भरावे लागतात. प्रवेशाचा फॉर्म हा प्रमाण मराठीत असावा. हा पहिलाच फॉर्म इंग्रजीतून स्वतः भरण्याची वेळ येते आणि विद्यार्थी दचकायला लागतो. अशा वेळेस शोकेसमध्ये जर नमुना-फॉर्म ठेवला तर तो पाहून संबंधित विद्यार्थी स्वतःचा फॉर्म भरू शकतो. अनेकदा अशा नमुना फॉर्मचे जसेच्या तसे अनुकरण होते व स्वतःच्या नावाऐवजी नमुना–फॉर्ममधीलच नाव लिहिण्याचा प्रकार घडतो. अशावेळी माहितीपत्रक विक्री करणाऱ्यांनी सोप्या भाषेत विद्यार्थ्याला समजावून द्यावे. महाविद्यालयात प्रवेश समिती असते, या समितीनेही विद्यार्थ्याशी संवाद साधावा, त्याला संपूर्ण माहितीपत्रकाचे वाचन करावयास प्रवृत्त करावे. हे माहितीपत्रक, त्यातील नियम, अटी, सूचना सुस्पष्ट शब्दात असाव्यात, सूत्रबद्धरीतीने महाविद्यालय, प्रवेशप्रक्रिया, उपलब्ध अभ्यासक्रम, कालावधी, फी, सवलती वगैरे माहिती असावी. या माहितीपत्रकांच्या किंमती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या बाबतीत माफक असतात तर तंत्रविद्या वा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे माहितीपत्रक अधिक 'मूल्यवान' असते. म्हणूनही माहितीपत्रकाचे वाचन करण्यास विद्यार्थ्यांस भाग पडावे, यासाठी त्याला माहितीपत्रकाचे महत्त्व पटवून द्यावे लागते. प्रवेशाच्या काळात पालकांचा वावर वाढतो. पालक व महाविद्यालय-कार्यालय यात सौहार्दाचे संबंध असावेत हे जरी खरे असले तरी बऱ्याचदा आक्रमक पालक भेटतात तर कधी गोंधळलेले पालक सैरभैर झालेले दिसतात. अशावेळी त्यांना समजावून सांगणे, लेखन व्यवहारात मदत करणे आवश्यक असते.

कार्यालयातील कार्यविभागणी विद्यार्थी किंवा पालक यांना माहीत नसते. त्या त्या विभागाच्या कार्याची ठळक नोंद समोर दिसत असली तरी हे अभ्यागत नोंद वाचतील याची खात्री नसते. आपल्या कामाच्या आकलनात ते गुरफटलेले असतात व हिशोब-विभागात प्रवेशाची चौकशी करतात. हिशोब-विभागाचे कर्मचारी त्यांच्या कामात मग्न असताना प्रवेशाची चौकशी होते. हिशोबाचे व्यवहार पहाणारे कक्षप्रमुख चकित होतात. याप्रसंगी संयमाने योग्य तो दिशानिर्देशक संवाद होणे आवश्यक आहे. 'इथे नाही, तिकडे जा', 'वाचता येतं का?', 'हा हिशोब विभाग आहे, प्रवेश विभाग नाही', 'काय शिकलेले लोक पण अक्कल नाही' अशा शेरेबाजीऐवजी आपल्याकडे आलेले पाहुणे 'चुकून' आलेले आहेत, त्यांना व्यवस्था माहिती नाही यासाठी संबंधिताने संयमाने बोलावे, उदा.

१. “नमस्कार, आपली काय अडचण आहे?”

“प्रवेश घ्यायचा आहे.”

“वा, कुठल्या वर्गात?”

“...”

“मग असं करा, क्रमांक तीनच्या खिडकीत / टेबलाकडे जा. आपला प्रवेश तेथे होईल.”

“धन्यवाद.”

“आभार”

२. “काय आहे इथं?”

“प्रवेश हवा होता.”

“काही अक्कल आहे का? प्रवेशाची जागा कुठे नि आले कुठे?”

“आम्हाला काय माहीत”

“तुमचे काय डोळे फुटले का? समोर फळ्यावर सर्व लिहिले आहे.”

“....”

“कोणीही उठायचं नि सुटायचं. अहो, ऑफीस आहे, धर्मशाळा नाही”

“....”

“पण आम्ही कुठं जायचं?”

“कुठेही जाहो, हं काय तुम्हाला आता प्रवेश घ्यायचा?”

“नाही, मुलीला”

“तिला शिकू द्या, तुम्ही काही शिकवलंत की नाही? कुठंय मुलगी?”

“तुम्ही उठा, तिच्याकडे द्या प्रवेशाचे कागद”

“पण हे प्रवेशाचे कागदपत्र कुठं द्यायचे?”

“तुम्हाला सांगितलं ना? उठा, यांना कोणी सोडलं माझ्याकडं?”

३. “नमस्कार”

“नमस्कार”

“बसा, काही काम होतं?”

“होय”

“सांगा”

“प्रवेश पाहिजे”

“कोणाला?”

अनुक्रमणिका

"मुलीला"

"अरे वा, शिकू द्या मुलीला, चांगलं आहे."

"...."

"हे बघा, क्रमांक तीनच्या खिडकीत प्रवेशाचं काम सुरू आहे."

"...."

"काय आहे, हा हिशोब विभाग आहे. आपण सर्व कागदपत्रं नीट पूर्ण केलीत ना? घ्या, अवश्य प्रवेश घ्या, मुलीला आता धाडस आलं पाहिजे. हरकत नाही, प्रारंभी आपण मदत केलीच पाहिजे. पुढं तिची कामं ती बरोबर करील."

"होय"

"हं, तीन क्रमांकाच्या खिडकीत हं. धन्यवाद, बरं झालं आपला परिचय झाला."

येथील १, २, ३च्या कल्पित संवादासारखे संवाद कुठेही घडू शकतात, माहिती देणे, मनाचे समाधान करवणे, व्यवहार सुलभ करणे हे भाषेचे कार्य असते. बोलणारा (प्रेषक) आणि ऐकणारा (ग्राहक) यांच्यात होणारा हा विनिमय व्यवहार उचित स्वरुपात व्हावा. संवाद विसंवाद झाला की उभयपक्षी ताण निर्माण होतात आणि या ताणाचा दोघांना त्रास होतो. वरील दुसऱ्या उदाहरणात प्रेषक व ग्राहक दोघेही संतप्त होण्याची शक्यता आहे. माणसे जोडण्याऐवजी तोडण्याची क्रिया येथे होऊ शकेल. मुख्य म्हणजे विद्यार्थी केंद्र असेल व तसे मानले जात असेल तर सुसंवाद हाच घटक कार्यालयीन भाषाउपयोजनात महत्त्वाचा असतो. विद्यार्थी / पालक / समाजघटक / शिक्षक / प्राचार्य या सर्वांशी सुसंवाद असेल तर कामात आनंद मिळतो. भाषाउपयोजनातून व प्रत्यक्ष कृतीतून हा आनंद वाढता ठेवला पाहिजे. एकतर तेच ते किंवा एकाच प्रकारचे काम करीत राहिल्याने, व्यक्तिगत / कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे जगण्यात तोचतोपणा येतो आणि त्याचा भाषाउपयोजनावर व संबंधावर परिणाम घडून येतो. त्याच त्या कृती यांत्रिक पद्धतीने करीत राहिल्याने अर्थशून्यता वाढीस लागू शकते म्हणून आपले कार्य व भाषाउपयोजन यात निर्मितीशीलता आणावी लागते.

कार्यालयीन भाषाउपयोजनात सर्जनशीलता आणणे म्हणजे आलंकारिक बोलणे करावे असे नाही. आपल्या वृत्तीप्रवृत्तीतच ही सर्जनशीलता जीवनदृष्टी म्हणून सामावली पाहिजे. कार्यालयीन तांत्रिक तपशील आपण लालित्यपूर्ण करू

अनुक्रमणिका

शकतो. म्हणजे तपशिलांचा काटेकोरपणा शाबूत ठेवूनही ही क्रिया करता येऊ शकते. उदाहरणार्थ - 'सूचना'

१. सर्व विद्यार्थ्यांसाठी सूचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, प्रवेशसमयी बऱ्याच विद्यार्थ्यांनी वेगवेगळी आर्थिक टंचाईची कारणे सांगून महाविद्यालयाची पूर्ण फी भरली नाही, अशा विद्यार्थ्यांनी आपली फी ताबडतोब भरावी. दिनांक.... नंतर फी न भरलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षाअर्ज दाखल करून घेतले जाणार नाहीत. दंडात्मक कारवाई करावी लागेल अशी वर्तणूक होऊ नये. दिनांक... पर्यंत फी न भरल्यास होणाऱ्या परिणामाची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांवर राहील याची नोंद घ्यावी.

(अधीक्षक)

२. सूचना

दिनांक....

विभाग - प्रवेश

विषय : फी-पूर्ती

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की ज्यांच्याकडे फी बाकी आहे, त्यांनी दिनांक.... पर्यंत पूर्ण फी न भरल्यास त्यांचे परीक्षा अर्ज दाखल करून घेतले जाणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांची जबाबदारी महाविद्यालयावर असणार नाही, याची नोंद घ्यावी.

(अधीक्षक)

३. सूचना

सर्व विद्यार्थ्यांसाठी

विविध आर्थिक अडचणींमुळे प्रवेशाच्या वेळी काही विद्यार्थ्यांनी पूर्ण फी भरलेली नाही. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची फी भरणे आवश्यक आहे, नाही तर महाविद्यालयच अडचणीत येईल. आपल्याकडे फी बाकी असेल तर दिनांक.... पर्यंत भरावी. आपणांस फी भरणे शक्य नसेल तर प्राचार्यांशी संपर्क साधावा.

(अधीक्षक)

या तिन्ही नमुन्यांपैकी पहिल्या नमुन्यात औपचारिकता आहे. शिवाय त्या सूचनेमधून अप्रत्यक्ष धमकावणी आहे. सूचनेचा परिणाम होईल परंतु संबंधितांच्या मनात भय व कटुताही निर्माण होईल.

दुसऱ्या नमुन्यातील सूचना सुटसुटीत आहे, येथे तपशिलास महत्त्व आहे,

अनुक्रमणिका

केवळ कोरडेपणाने संदेश पाठवलेला दिसेल.

तिसऱ्या नमुन्यात थेट वाचकाशी आणि संबंधितांशी संवाद साधला आहे. 'सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की' ही ओळ येथे नाही, ही ओळ फारच वापरली जाते, तिच्या अतिवापरामुळे तिच्यातील अर्थनिर्माणक क्षमता बाद झाली आहे. 'कळविण्यात येते की' हे म्हणण्याचे खरे तर काय कारण आहे! 'सूचना' या शब्दातून / शीर्षकातून तोच आशय प्रकट होतो. 'प्रमाणपत्र' या शीर्षकाखाली असाच 'प्रमाणित करण्यात येते की' मजकूर असतो, त्याची काय आवश्यकता आहे? 'कळविण्यात येते की' हा शब्दबंध इंग्रजीतील औपचारिकता भाषांतरित करणारा आहे. आपण आता अशी औपचारिकता टाळू शकतो. तिसऱ्या 'सूचना' या नमुन्यात संदेश, तपशील सर्व बरोबर आहे फक्त सूचित करण्याची भाषा बदलली आहे. येथे अपेक्षित ग्राहकास विश्वासात घेतले आहे, त्याच्या अडचणींशी परिचित असल्याचे दर्शविले आहे व अपेक्षित कृतीची अपरिहार्यताही सांगितली आहे. अपेक्षित ग्राहकास धीरही दिला आहे. कार्यालयीन कामकाज हे यंत्रवत होण्याऐवजी मानवी परिप्रेक्ष्यातून होण्यासाठी समंजस व सौहार्दपर भाषेचे उपयोजन आवश्यक ठरते. जीवनात मानवीय संवेदनांचा उद्घोष अपेक्षित असतो आणि तो कृती - उक्तींमधून अभिव्यक्त करणे ही गरज आहे.

तपशिलांची मांडणी करताना ही खबरदारी आपण घेऊ शकतो. तपशिलांच्या कचाट्यात आपले विद्यार्थी किंवा पालक बिचकता कामा नयेत. जे सांगायचे तेच सांगावे पण मांडणी बदलावी. सांगण्याची मांडणी बदलताना आपल्यालाही आनंद होईल आणि अपेक्षित ग्राहकाला आधार मिळेल. वरील सूचना एका वेगळ्या पद्धतीने मांडून पाहू :

४. ॥ सूचना ॥

विद्यार्थी मित्रहो,

परीक्षा-फॉर्म भरण्याची मुदत जवळ आली आहे, आपल्याला हे फॉर्म विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत भरायचे आहेत.

हो, आणखी एक म्हणजे आपल्याकडे प्रवेश घेतेवेळी काही फी बाकी राहिली आहे का?

आठवा.

पावती पहा.

फी बाकी असेल तर दिनांक.... पर्यंत भरा.

नाही तर फॉर्म भरताना अडचण येईल.

असे होऊ नये म्हणून फी-बाकी पूर्ण भरा आणि परीक्षा-फॉर्मही मुदतीत भरा.

(अधीक्षक)

वास्तविक 'सूचना' लिहिण्याची अशी पद्धत नाही, सूचनापत्रक म्हटले की कोरडेपणाने तपशील / मजकूर सांगणे किंवा धमकावणे असेच गृहीत धरले गेले आहे.

वरील चौथा नमुना हा आपल्याला कोठेही पहायला मिळणार नाही, किमान महाविद्यालयांच्या सूचना फलकावर तरी!

तेव्हा या चौथ्या नमुन्यात बरोबरीच्या नात्याने विद्यार्थ्यांशी संवाद साधला जाताना दिसेल. 'कार्यालय' हे काही तरी अडवणुकीचे किंवा विलंब करण्याचे माध्यम असते ही भावना कमी होईल. तहसीलदारांच्या कार्यालयात, पोलीस स्टेशनमध्ये किंवा एखाद्या कारखान्याच्या कार्यालयात ज्या तऱ्हेचा भाषाव्यापार चालतो तसा महाविद्यालयीन कार्यालयात असत नाही. वरील पद्धतीची सूचना समजा आपण तयार केली तर रूढ भाषिक चाकोरीचे वा विधिसंकेतांचे उल्लंघन होईल व भाषाव्यवहाराची अर्थ प्रकट करण्याची, अर्थ संप्रेषित करण्याची क्षमता वाढीस लागेल. महत्त्व असते ते संदेशाला पण संदेशाबरोबर ज्याच्यावर परिणाम घडवून आणायचा आहे, त्या ग्राहकाला (येथे विद्यार्थी / पालक) देखील महत्त्व दिले जावे. सरळ त्याच्याशी संवाद साधल्याने त्या ग्राहकावर सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता अधिक आहे.

महाविद्यालयाच्या कार्यालयाशी शासनाचा पत्रव्यवहार असतो. पत्रे /परिपत्रके वा अन्य माहितीपत्रके येत असतात, त्यांची पूर्तता करावी लागते. ही प्रशासकीय भाषा फार गुंतागुंतीची व संदिग्ध अशी घडविलेली (खरे तर बिघडवलेली) असते.

उदा. १.

विषय : राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली सेवेमध्ये नोकरीच्या पर्याप्तसंधी वैधानिक मंडळाच्या क्षेत्रनिहाय समन्वयी तत्त्वावर उपलब्ध करून देण्यासाठी.

खरे तर पत्रकाचा विषय येथे गुंतागुंतीचा झाला आहे, त्याची उकल करण्याची वेळ शिक्षकेतरांवर येते. वरील विषयाचा बोध व्हायचा असेल तर 'वैधानिक मंडळ', 'समन्वयी तत्त्व', 'पर्याप्त संधी' या संकल्पनांची सामान्य माहिती हवी. कार्यालयीन क्षेत्राबाहेरच्या मराठी माणसाला 'उपरोक्त' विषय कळेलच असे नाही.

या विषयाचा अर्थ लावताना 'नोकरीच्या पर्याप्त संधी' आणि 'क्षेत्रनिहाय समन्वयी तत्त्व' हे शब्दबंध महत्त्वाचे आहेत, हे लक्षात घ्यावे लागेल. हा विषय पुढीलप्रमाणे मांडून पाहू.

विषय : 'वैधानिक मंडळाच्या क्षेत्रानुरूप नोकरीच्या पुरेशा संधी समन्वयाच्या तत्त्वावर उपलब्ध करून देणे'

शब्दसंक्षेप, समासनिर्मिती वगैरे करताना प्रत्ययांचा लोप करण्याची गरज निर्माण होते आणि अर्थ-संदिग्धताही निर्माण होते. समासाची प्रवृत्ती टाळून प्रत्ययांचा वापर वाढविल्याने भाषेचा भारदस्तपणा कमी होतो, अशा समजामुळे हे सारे घडते. शासकीय भाषाव्यवहार भारदस्त असावा तसाच तो अर्थसक्षमही असावा, हे तत्त्व स्वीकारले तर कार्यालयीन भाषाव्यवहारात सुगमता व अर्थस्पष्टता येऊ शकेल.

शासकीय भाषेतील संमिश्र वाक्यचरनाही अर्थसुलभता कमी करतात.

उदा. २

".... सदर पत्र प्राप्त होताच प्रथम प्राचार्यांचे आर्थिक व्यवहारात वापर केल्या जाणाऱ्या स्वाक्षरींचे नमुना स्वाक्षरी पत्र नमुना स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पुणे / नगर /नाशिक जिल्ह्यात असणाऱ्या शाखांचेकडून प्राप्त करून घेऊन या कार्यालयास.... चे धनादेश नेणेपूर्वीच प्राप्त होईल या दृष्टीने कार्यवाही करावी...."

वरील पत्राचा आशय कळण्यासाठी 'नमुना स्वाक्षरी पत्र' म्हणजे काय हे लक्षात घ्यावे लागेल. हे पत्र बँकेच्या प्रमुखांकडून प्रमाणित करून घ्यावे लागेल. ही कार्यपद्धती माहीत असायला हवी. कार्यपद्धती माहीत असेल तर अशी कार्यालयीन भाषा कळते. सहजता यावी या दृष्टीने वरील मजकूर पुन्हा एकदा मांडून पाहू :

"आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य आर्थिक व्यवहारासाठी सर्वत्र जी स्वाक्षरी करतात ती नमुनापत्रकात स्टेट बँकेच्या स्थानिक प्रमुखांकडून प्रमाणित करावी. हे स्वाक्षरी नमुनापत्र धनादेश नेण्यापूर्वी सादर करावे." (ही मांडणी आणखी सुलभ करता येऊ शकेल)

उदा. ३

".... तुकड्यांची मागणी करताना सध्या सदर वर्गास उपलब्ध असलेल्या तुकड्यांची वर्गवार संख्या आणि पुढील शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक असलेल्या तुकडींची निकड अर्जामध्ये (विस्तार, स्वाभाविक वाढ, नव्याने) नमूद करणे आवश्यक आहे. पुढे आपणास असेही कळविण्यात येते की, शासनाच्या आणि विद्यापीठाच्या मान्यतेशिवाय विस्ताराचे विषय सुरू करू नयेत. अन्यथा

विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही. नूतनीकरण / विस्ताराचे शुल्क डिमांड ड्राफ्टने पाठवावे....”

येथे वाक्ये जरा मोठी आहेत. त्यातील महत्त्वाचा भाग संख्यांशी संबंधित आहे. या मजकुराच्या वाचनानंतर आपण त्याची एक मांडणी करून पाहू.

वर्ग	उपलब्ध तुकड्या	वाढीव तुकड्यांची मागणी		
		विस्तार	स्वाभाविक वाढ	नव्याने

असा तक्ता तयार करून घेऊन वाढीव तुकड्यांची निकड नोंदवणे आवश्यक ठरेल. मजकुराची पुनर्मांडणी केली की आशयाचे आकलन सहज होते!

शासकीय पत्रांचे / परिपत्रकांचे आकलन करून घेताना त्यातील महत्त्वाचा तपशील अगोदर लक्षात घ्यावा लागेल. आपल्या भाषाउपयोजनातही स्पष्टता व सहजता आणावी लागेल.

वित्तविभागाशी संबंधित परिपत्रके, सूचनापत्रे यांचे आकलन करून घेताना व पुढे कार्यवाही करताना सावध रहावे लागते. त्यातील तपशील समजावून घेताना मजकुराच्या आकलनाचे काही टप्पे पडतात, काही महत्त्वाचे मुद्दे समजावून घ्यावे लागतात.

उदाहरण - ४

“... परंतु वरील दराप्रमाणे महागाईभत्ता वाढ दिनांक १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३ या कालावधीत मंजूर करताना दिनांक १ एप्रिल २००२ पासून मंजूर करण्यात आलेल्या अतिरिक्त महागाईभत्त्याच्या ३ टक्के वाढीतील २ टक्के रक्कम रोखीने मंजूर करावी व उर्वरित १ टक्का रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधी खात्यात वर अनुक्रमांक १ येथील शासन निर्णय, वित्तविभाग, ३ मार्च १९८८च्या परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार जमा करण्यात यावी. ज्या कर्मचाऱ्यांच्या नावे भविष्यनिर्वाह निधी खाते उघडण्यात आले नसेल अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांचे नावे भविष्यनिर्वाह निधी खाते उघडण्यात येईल त्यावेळी थकबाकीची रक्कम काढून भविष्यनिर्वाह निधी खात्यात जमा करण्यात यावी. ....”

अनुक्रमणिका

या मजकुराचे काळजीपूर्वक वाचन केल्यावर आपल्याला महत्त्वाचे काय लक्षात आले आहे, त्याची नोंद करू.

अ) महागाई भत्ता वाढ - दिनांक १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००३

ब) अतिरिक्त महागाई भत्ता - ३ टक्के

क) भविष्यनिर्वाह निधी - १ टक्का

ड) रोखीने द्यायची रक्कम - २ टक्के

इ) रक्कम जमा करण्याची पद्धती
(त्यासाठी शासन निर्णय, वित्त विभाग, ३ मार्च १९८८, परिच्छेद - ६ पहावा लागेल)

फ) काही कर्मचाऱ्यांचे भविष्यनिर्वाह निधी खाते नाही - काय करावे लागेल? (थकबाकी काढावी, पुढे खाते उघडण्यात आल्यावर त्यात ती रक्कम जमा व्हावी)

भ) आणखी खुलासा - ब = क + ड

या नोंदीवरून तक्ता तयार करून पाहू.

कर्मचारी - नाव	एप्रिल २००२ चा महागाईभत्ता	अतिरिक्त ३%	रोखीने २%	भविष्यनिर्वाहनिधीत १%

येथे भविष्यनिर्वाह निधी खाते क्रमांक, महिना / वर्ष वगैरे तपशील तक्त्यात समाविष्ट करावा लागणार आहे. खाते नाही त्यांची स्वतंत्र नोंद करावी लागेल.

सारांशाने असे म्हणता येईल की महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय / विद्यापीठीय भाषाव्यवहाराचे आकलन करून घ्यावे लागते. त्यासाठी निकटवाचन व पूर्वसंदर्भशोध यांची आवश्यकता असते.

हिशोबांचे लेखन, पत्रव्यवहार, परिपत्रकांचे आकलन, स्थानिक व्यवस्थापन-समितीचे इतिवृत्तलेखन, खरेदी-समिती, नियोजन-समिती, अंदाजपत्रक-समिती, तक्रार-निवारण-समिती वगैरे समित्यांचे इतिवृत्तलेखन, आवक-जावक नोंद, विद्यार्थ्यांशी निगडित सांख्यिकीय माहितीचे संप्रेषण अशी विविध प्रकारची कार्ये करावी लागतात. इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांमधून हे कामकाज चालते, तेव्हा कामकाजातील भाषेत नेमकेपणा व जिवंतपणा अपेक्षित असतो. त्यासाठी भाषेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन नव्याने घडवावा लागू शकतो. तपशिलातील

अनुक्रमणिका

काटेकोरपणाबरोबरच शब्दउपयोजनात काटेकोरपणा व सहजता आणावी लागेल. भाषेच्या यांत्रिक व रूढ वापरात काही एक सर्जक बदल आपण घडवून आणू शकतो. त्यासाठी संदेशाच्या संप्रेषणाइतकेच महत्त्व संदेश ग्रहण करणाऱ्यालाही (ग्राहक) द्यावे लागते. ■

देवळा, ४२३१०२ (नाशिक)

मातृभाषा आणि ज्ञान निर्मिती

"ज्ञानाचा जसाच्या तसा स्वीकार करणे आणि ज्ञानाची प्रतीती येणे या दोन बाबी मूलतः भिन्न आहेत. ज्ञानाची प्रतीती ही मानवी जीवनातील एक अत्यंत महत्त्वाची अवस्था असते. कारण या अवस्थेतूनच माणूस ज्ञानाच्या निर्मितीकडे जाऊ शकतो. परंतु जोपर्यंत आपण इंग्रजीवर अवलंबून राहू तोपर्यंत आपणांस ज्ञानाची प्रतीती येणार नाही आणि ज्ञानाची निर्मितीही करता येणार नाही. आपण केवळ वेगवेगळ्या प्रकारची माहिती गोळा करणारे संग्राहक असू, कारण ज्ञानाची निर्मिती ही मानवी बुद्धीचा, विचारसामर्थ्याचा सर्वश्रेष्ठ आविष्कार असतो. असा आविष्कार परभाषेवर अवलंबून राहिल्याने कधीही होत नाही. विचारसामर्थ्य हे खऱ्या अर्थाने मातृभाषेतूनच विकसित होऊ शकते. कारण विचार करण्याची प्रक्रियाच मुळी मातृभाषेतून घडत असते. आपण कुठल्याही भाषेत बोलत असलो तरी विचार मात्र मातृभाषेतच करीत असतो. म्हणूनच शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असले पाहिजे, असे शिक्षणशास्त्रज्ञांना वाटत असते. त्यासाठीच मातृभाषेची साधनाही केली पाहिजे. भारताशिवाय जगाच्या पाठीवर मातृभाषेकडे दुर्लक्ष करणारा दुसरा कुठलाही देश नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे.

याचा अर्थ असा की, 'पहिलीपासून इंग्रजी' हे धोरण वरकरणी कितीही चांगले आणि आकर्षक असले, इंग्रजी शाळांची मक्तेदारी मोडून काढणारे असले, बहुजनांच्या प्रगतीचे द्वार उघडून देणारे आहे असे वाटत असले तरी अंतिमतः इंग्रजीचे अतिरिक्त महत्त्व मनावर ठसविणारे, आणि इंग्रजीवर सर्वस्वी अवलंबून राहावयास लावणारे आहे यातही काही शंका नाही. इंग्रजीमुळे कदाचित नोकऱ्या मिळतील, परंतु आपल्याकडून ज्ञाननिर्मिती मात्र होणार नाही, हेही निश्चित. आपण इंग्रजीच्या साह्याने जगभरातील ज्ञान आयात करीत राहू. ज्ञानाच्या क्षेत्रात सतत आयात करणारा देश म्हणूनच मग आपली प्रतिमा होईल. याचा परिणाम म्हणून आणखी काही वर्षांनी शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच करा ना, असाही आग्रह सुरू होणारच नाही असेही नाही." ■

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, "मातृभाषा आणि शिक्षणासंबंधी थोडेसे",
'साहित्याचा अवकाश' : प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००३, पृ.२४०

महाभारतात मराठी

कृष्ण श्री. अर्जुनवाडकर

गेलं वर्ष दीड वर्ष आमच्या घरी मूळ महाभारताचं पंक्तिशः वाचन चालू आहे. हे वाचन करताना मी चित्रशाळेची प्रत वाचतो; आणि माझी पत्नी, भांडारकर संस्थेची, चिकित्सित आवृत्तीतून वेगळी छापलेली मूळ श्लोकांची प्रत. दिवसातून सुमारे दीड दोन तास आम्ही वाचतो; एका बैठकीला सुमारे १५०-२०० श्लोक वाचून होतात. या वाचनामुळे विस्तृत प्रतीतून चिकित्सित प्रतीत काय काय गाळलं आहे, कोणती अपमुद्रितं आहेत, त्याचा जसा पत्ता लागतो, तसा महाभारताची कथा, भाषा, काव्य, अन्य सांस्कृतिक सामग्री यांचाही मोठ्या प्रमाणावर संग्रह होतो. या संग्रहातून अनेक अभ्यासलेख कालांतराने साकार होतील. त्यातला मराठीशी संबद्ध असलेला एक लक्षणीय अंश इथं मांडायचा आहे. मराठी ही संस्कृताधारित भाषा असल्यामुळे बहुसंख्य मराठी शब्दांची मुळं संस्कृतात आढळावी यात काही नवल नाही. नवल हे की मराठी (क्वचित हिंदी...) वाक्प्रचार, शब्द, संकल्पना यांच्याशी मिळतेजुळते पुष्कळ वाक्प्रचार, शब्द, अर्थ, संकल्पना, भाषाविकृती इत्यादी सामग्री या ग्रंथांत आम्हाला आढळून आली. अन्य संस्कृत ग्रंथ वाचताना सहसा न आढळणारी ही सामग्री महाभारतासारख्या प्राचीन ग्रंथात सापडते याचं मला नवल वाटलं. ती सर्वसाधारण मराठी वाचकांना उद्बोधक, मनोरंजक वाटेल असं वाटतं. अर्थात् जे नमुने मी मांडणार आहे ते, जो भाग वाचून झाला आहे (सध्या, आरंभापासून भीष्मपर्वाअखेरपर्यंत) त्यातले आहेत; वाचून न झालेला भाग अजून पुष्कळ आहे. या नमुन्यांचे ग्रंथातले पत्ते, मूळ टिपणांत आहेत तसे, रोमन लिपीत दिले आहेत, त्यातले संक्षेप आणि त्यांचं विवरण पुढं देत आहे :

p = page number, preceded by Book (parvan) number

I, II, III... = serial numbers of Books in the original text

(Chitrashala Edition, Pune, edited, from book 3 onwards, by Pandit Ramchandrashastri Kinjawadekar: 1928-1936.)

BG = Bhagavadgita

या टिपणात आलेल्या पर्वांची क्रमशः नावं अशी आहेत : I आदिपर्व, II सभापर्व, III वनपर्व, IV विराटपर्व, V उद्योगपर्व, VI भीष्मपर्व. पुढील नोंदीत प्रथम संस्कृत शब्द, आणि त्यामागून कंसात मराठी पर्याय (क्वचित मूळ शब्दसंहती) दिले आहेत. ज्यांना बऱ्यापैकी संस्कृत येतं, त्यांना या टिपणाचा अधिक प्रमाणात आस्वाद घेता येईल. तुरळक ठिकाणी महाभारताचा टीकाकार नीलकंठ चतुर्धर (चौधरी) याचा आधार दिला आहे.

पृष्ठगोप (पिछाडी राखणारा) (p/I. 324, IV. 50) ; वक्तुं नायाति (बोलता येत नाही) (p/II. 41);

पञ्च पञ्च (मराठी 'पंच') (प्रशास्ता, समाहर्ता, संविधाता, लेखक :, साक्षी - नीलकंठ) (p/II. 15);

तृतीया प्रकृतिः (नपुंसक) (p/II. 67, IV. 4): कृष्णो गह्वरितोऽभवत् (गहिवरला) (p/II. 111);

मेढीभूतः (स्तम्भीभूतः; मेढ) (p/III. 20, V. 69);

एवं संकुपिते लोके जन्म कृष्णे! न विद्यते (माणसं अशी अनावर झाली तर जीवन अशक्य हाईल) (p/III. 50);

हेषुक = फावडं (p/III. 171); अञ्जीर (अंजीर), करमर्द (करवंद) (p/III. 247); पर्वतसंधि = घळ (p/III. 250);

वत्सदन्त = बाण (p/III. 252); व्यंसयामास = हुकवला (p/III. 252);

संप्रधार्य (एखाद्यावर सोपवून) (p/III. 253); मृषा (खोटा, अकारण) वध : (p/III. 253);

जलं भक्षयतो (पाणी पीत असता) गतः (p/III. 262);

शरैरहमताडयम् (बाणांनी 'चोपलं') (p/III.263);

उपोपविश्य ('उप' द्विरुक्त; p/III275); एडूक = थडगं(p/III.275);

राङ्कव (<रङ्कु, = हरीण; गादी) (p/III.386)

वत्सानामपि चाङ्कनम् (डागणं; branding; p/III.390); पराक्रमेण मृदुना (बेताचा, माफक) (p/III.395);

कौरवाणां प्रत्यागतं मनः (जिवात जीव आला) (p/III.395;); लघुसत्त्व (हळवा, भ्याड) (p/III.401);

न चापि पादभाक् (पाव हिस्साही नाही) कर्णः पाण्डवानां.. (p/III.405);

आमन्त्रयति (निमंत्रण करतो) (p/III.408);

वाक्यैर्वाक्यानि युञ्जन्ती (वाक्याला वाक्य / शब्दाला शब्द जुळवीत) (p/

III.422):

तल्त्र (हातमोजा; p/III.422): भ्रातृगन्धिक (नावापुरता भाऊ) (p/III.442):

चन्द्रं जिघृक्षुरिव (चंद्र पकडू पाहणारा) (p/IV.23): आवारयिष्यामि (आवरतो) (p/IV.67,73; V.271):

मुखं प्रयच्छ (तोंड दे)(p/IV.93): अस्य शङ्खप्रणादेन कर्णौ मे बधिरीकृतौ (कानठळ्या बसल्या) (p/IV.102):

भक्षयिष्याम पांसुकान् (धूळ चारणं) (p/V.26): शक्यं हर्तुं पाण्डवानां ममत्वम् (मालमत्ता)(p/V.35):

लघु यासां दर्शनं वाक् च लघ्वी (ज्यांचं दिसणं आणि बोलणं आहे लाघवी!) (p/V.47):

शुष्केणार्द्रं दह्यते (सुक्याबरोबर ओलं जळतं) मिश्रभावात् (p/V.60):

न संरोहति वाक्क्षतम् (शब्दांची जखम भरून येत नाही) (p/V.61):

वासो यथा रङ्गवशं प्रयाति (कपडा जसा रंग घेतो; p/V.66):

जान्वोर्मूर्धानमाधाय (गुडघ्यात डोकं घालून) (p/V.152): मांसशोणितभृन्मर्त्यः (हाडामासाचा) (p/V.157):

लेखाश्मनीव...(दगडावरची रेघ) (p/V.165): मनःप्रविष्टः (मनात भरला) (p/V.186):

मनसा शोचता किल (हिंदी 'सोचना') (p/V.197): नैते कृत्याय कर्हिचित् (कामाचे नाहीत) (p/V.209):

प्राणांस्त्यक्त्वा, त्यक्तप्राणः (जिवावर उदार) (cp.BG I,p/V.288):

पाण्डवानां...कुरूणां च समागमः (सामना) (p/VI.30):

हृष्टाः सुमनसो भूत्वा चैलानि दुधुवुश्च ह । (फेटे उडवले) (p/VI.152):

सायकेन सुपीतेन (पाणी पाजलेल्या..) (p/VI.157): शरान् पीतान् (पाणी पाजलेले, p/VI.215):

तैलधौताः शक्तयः/शराः (तेल पाजलेल्या, p/VI.229,244):

आदश्य दशनैश्चापि क्रोधात् सरदनच्छदम् (दात-ओठ खाऊन; p/VI.160):

हुण्ड (कौरवपक्षीय गण; दांडगा; p/VI.169)

हस्तलाघवम् (p/VI.208): भर्तृपिण्डमनुस्मरन् (अन्नाला जागत, p/VI.213):

भण्डीपुष्प (भेंडाचं फूल, p/VI.245): दंशिता (डिवचलेले, p/VI.256):

मांसान्युत्कृत्य दास्यामि (मांसाचे लचके तोडून देईन, p/VI.262);
सुदृष्टः क्रियतां (पोटभर पाहून घे) भीष्म लोकोऽयं.. (p/VI266);
द्वयङ्गुलमन्तरम् (दोन अंगुळं जागा, p/VI.286);
शिरो मे लम्बतेऽत्यर्थ (माझं डोकं लोंबकळत आहे, p/VI.288);
(कर्ण भीष्माला म्हणतो :) नित्यमक्षिगतस्तव (नेहमी तुझ्या डोळ्यांत सलणारा / खुपणारा) (p/VI.291);
झर्झर (झांज) (p/VI.246)

■

२ देवांगिनी, ११९२ शुक्रवार पेठ, पुणे ४११०१२

प्रमाणभाषा आणि बोलीभाषा

हस्ताक्षर चांगले काढावे हा विवादाचा विषय नाही, पण शुद्धलेखन हा विवादाचा विषय झालेला आहे याची कारणे पुष्कळ आहेत. पहिले कारण असे की, प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्या परस्पर संबंधांविषयी आणि त्यांच्या सापेक्ष किंवा तौलनिक स्थानांविषयी मराठी भाषकांमध्ये नुसता मतभेदच नव्हे तर गोंधळ आहे; आणि दुसरे कारण असे की भाषेचे लेखन उच्चाराप्रमाणे असावे असे काही पाश्चात्य पंडितांनी सांगितले ते आमचे लोक योग्य धरून चालले आहेत. आणखी एक लहानसे कारण आहे ते संस्कृतपासून भ्रष्ट होऊन आजच्या बोली निघाल्या या समजावर आधारलेले, म्हणजे भाषा नित्य सोपी होत जाते असे मानणारे आहे. भाषेचे सतत सुलभीकरण केले गेले पाहिजे या समजावर आधारलेले आहे. कसेही आणि काहीही लिहा; वाचकाला कसाबसा अर्थ समजला म्हणजे झाले असे मानणाऱ्यांचे सध्या बहुमत आहे.

प्रमाणभाषा ही पुष्कळशी कृत्रिम भाषा असते. ती कोणत्याही जनसमुदायाची मातृभाषा नसते, ती बहुजनसंमुख नसते, ती इतिहासाभिमुख असते. दैनंदिन वापरामध्ये जे विषय कधीच येत नाहीत अशा वेगवेगळ्या विषयांसाठी ती वापरावी लागत असल्यामुळे तिच्यामध्ये आपोआप घडलेले सिद्ध शब्द कमी असतात आणि मुद्दाम घडविलेले साधित शब्दच फार जास्त असतात. भावभावना किंवा गुंतागुंतीचे विचार शब्दांत व्यक्त करण्यासाठी ती मुद्दाम घडविलेली, थोडक्यांत बनावट भाषा असते. प्रत्यक्षांत कोणी 'मला असीम आनंद झाला', किंवा 'मला अपार दुःख झाले', असे सांगत नसतो.

■

दिवाकर पुरुषोत्तम मोहनी, "आजचा सुधारक", १५.५

ही कोण भवानी?

माधवी कोल्हटकर

व्यापारी किंवा विशेषतः फिरते विक्रेते जेव्हा त्यांच्या दुकानातल्या खरेदी-विक्रीला सुरुवात करतात, त्यावेळी सुरुवातीच्या पहिल्या विक्रीला ते 'भवानी' म्हणतात. "बाई, आज अजिबात भवानी झाली नाही, काहीतरी घ्या." "बाई, तुमच्या हाताने भवानी होऊ द्या!" "बाई, भवानी आहे. उधार कशी देऊ? काहीतरी तरी द्या." ही आणि अशासारखी वाक्ये आपल्या नेहमीच्या परिचयाची आहेत.

मोल्सवर्थच्या मराठी-इंग्रजी कोशात 'भवानी' या शब्दाखाली पहिला 'पार्वती' हा अर्थ देऊन दुसऱ्या अर्थासाठी 'बोहणी' हा शब्द बघायला सांगितला आहे. 'बोहणी' या शब्दाखाली खालील माहिती दिली आहे - 'बोहणी or नी f. (भवानी because ascribed to her auspices...) The first sale of goods occurring after the dawning of the day. It is usually for ready money; and the luck of the day is viewed as determined by it.... बोहणीचे प्रहरी or पाहरी At the hour of बोहणी; in the early morning.'

यावरून सकाळच्यावेळी होणाऱ्या पहिल्या विक्रीला भवानी किंवा बोहणी म्हणतात हे उघड आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वसाधारणपणे ही खरेदी - विक्री रोखीत होते, आणि त्यावरून दिवसभराचे भवितव्य ठरते. भवानीचा प्रहर म्हणजे बोहणीचा प्रहर म्हणजेच सकाळचा प्रहर ही माहिती कळते. पण मोल्सवर्थने बोहणीला भवानी म्हणतात कारण ती तिच्या आशीर्वादाने होते, असे म्हटलेले आहे, ते का हे मात्र या माहितीवरून लक्षात येत नाही. बऱ्याचवेळा बंगाली भाषेत आणि उडिया भाषेत आपल्याला काही साम्य आढळून येते. बंगाली भाषेत 'बोडनी' हा शब्द या अर्थाने वापरला जातो. एका उडिया भाषकाला या संदर्भात विचारले असता त्यांनी अशा प्रकारच्या पहिल्या विक्रीला 'वहनी' असे म्हणतात असे सांगितले. त्यांनी हेही सांगितले की पहिली खरेदी-विक्री ही रोखीतच व्हावी लागते.

ही माहिती आपल्या दृष्टीने महत्त्वाची आहे. वह् या धातूचा अर्थ नेणे, इकडून तिकडे घेऊन जाणे असा आहे. त्यापासून बनलेल्या 'वहनी' या नामाचा अर्थ त्यामुळे देवघेव, व्यवहार अशासारखा होऊ शकतो. म्हणजेच ही नुसती खरेदी नाही. हा

खरेदी-विक्रीचा व्यवहार आहे. वस्तू घेऊन पैसे देणे हे यात अपेक्षित आहे. हा अर्थ आपल्या 'भवानी' या शब्दाच्या अर्थाशी सुसंगत आहे. 'व' चा 'ब' होणे ही नेहमी आढळणारी गोष्ट आहे. त्यामुळे 'वहनी'चे 'बहणी' किंवा 'बोहणी' झाले असावे. 'ब' चा 'भ' आणि त्यामुळे पुढच्या 'ह' चा 'व' ही प्रक्रियाही आपल्याला दिसून येते. मराठी बहिणीची उडिया भाषेत भऊणी होते. त्याप्रमाणे 'वहनी'चे 'बोहणी' - 'भोनी' आणि मग 'भवानी' होणे अशक्य नाही. अशा खरेदी-विक्रीच्या व्यवहारांची जागा पुढे भवानीपेठ झाली.

गावभवानी या शब्दाचा उगमही कदाचित् या वहनीवरुन असेल? प्रत्यक्ष खरेदीविक्रीचा व्यवहार नंतर मागे पडून बोलणे, लोकांना भेटणे, गप्पात जास्त वेळ घालवणे, या गोष्टी करणाऱ्या, म्हणजेच एकप्रकारे भाषिक वहनी करणाऱ्या व्यक्तीला किंवा स्त्रीला यामुळेच तर गावभवानी म्हणत नसतील?

आता थोडे या शब्दाच्या इतिहासाविषयी. शं. गो. तुळपुळे आणि ॲन फेल्डहाऊस यांच्या मध्ययुगीन मराठीच्या कोशात 'भवानी' हा शब्द या अर्थाने येत नाही. 'बोहणी' हा शब्द मात्र येतो, आणि त्याचा अर्थ beginning, प्रारंभ असा दिलेला आहे. संदर्भ आहे -

सुषुम्नेचेनि तोंडे । गिळिजे प्राणापानाचे लोंढे ।
बोहणियेसीचि येवढे । भारी जेथ ॥ ज्ञानेश्वरी १८. ७८१

पुढे तुकारामगाथेत हा शब्द 'भोवनी' असा येतो. स. के. नेऊरगावकर यांनी संपादित केलेल्या आणि प्राचार्य दांडेकर धार्मिक व सांस्कृतिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या गाथेत ३४२१. ३ गाथा अशी आहे - लाभ अथवा हानी । थोड्यामध्येच भोवनी ॥ (दिलेला अर्थ - लाभ अथवा हानी होणार हे थोड्यामध्येच सुरुवातीस कळून येते). कानडे-नगरकरांच्या कोशात 'भोवनी' शब्दाखाली १) फेरा आणि २) विक्रीचा शुभारंभ असे अर्थ दिलेले आहेत. दुसऱ्या अर्थाने हा शब्द संपूर्ण गाथेत फक्त एकदाच आलेला दिसतो.

ज्ञानेश्वर ते तुकारामापर्यंतच्या तीन-चारशे वर्षांच्या कालखंडात आपल्याला अशा रीतीने 'बोहणी'चे 'भोवनी' झालेले दिसते. त्यामुळे त्याच्या पुढच्या काळात भोनी - भवानी असे त्यांचे पुनःसंस्कृतीकरण झालेले असावे.

[या संदर्भात एक गोष्ट सुचवावीशी वाटते. शालेय शिक्षणात जर आपण विद्यार्थ्यांना भारतीय भाषांची आणि विविध भारतीय लिप्यांची ओळख करून देऊ शकलो तर त्याचा निश्चित फायदा होऊ शकेल. लहान वयात शिकलेल्या गोष्टी

पुढे जन्मभर विसरत नाहीत. हवे तर त्यांची परीक्षा घेऊ नये. ज्यांना भविष्यकाळात जरूर पडेल त्यांची प्राथमिक तयारी तरी झालेली असेल. या दृष्टीने इथे आवर्जून नोंद करावीशी वाटते की अमेरिकेतल्या अनेक शाळांत प्राथमिक शिक्षणात एक वर्ष मूकबधिरांसाठीच्या भाषेचे तसेच ब्रेल लिपीचेही जुजबी ज्ञान दिले जाते.]

■

८८५/३, भांडारकर मार्ग, ६वी गल्ली, पुणे ४११००४

प्रेम आणि प्रीती

एकसारखे वाटणारे शब्दही एकासारखे नसतात. त्यातल्या सूक्ष्मतरल छटा टिपण्यानं शब्दाचं वेगळं सौंदर्य जाणवतं. काननमध्ये उपवनाचा गोडवा आहे; तर 'जंगला'मध्ये वृक्षांच्या दाटपणात श्वापदांचे सळसळणं आहे; तर समानार्थी वाटणाऱ्या 'अरण्या'त गूढमिश्रित रौद्रभीषणता आहे. तसंच पावरी, अलगूज, बासरी, मुरली - वाद्य एकच; पण त्याचे रूपरंग वेगळे हल्ली 'उचललं पेन लावलं कागदाला' पद्धतीनं हाती येईल तो शब्द कसा तरी वापरून 'फिट्ट' केला जातो. पण ज्याला मनःपूर्वक लेखन करायचंय् अशांनी जाणीवपूर्वक प्रत्येक शब्द 'पाहायला' शिकायला हवं. नीट शोधलं तर कळेल, कुठलाच शब्द समानार्थी नसतो. अर्थाच्या जवळ जाणारा असेल; पण त्याचं नव्याने व्यक्त होणं निराळ्या कारणासाठी असतं. हिरवा न् पोपटीमध्ये फरक दिसतो तसाच फूल न् कुसुममध्ये आहे. फूल केव्हा आणि कुसुम केव्हा याच्या जागा ठरलेल्या आहेत. डोळा न् नयन अवयव एकच आहे पण लेखनात हे शब्द वापरताना काना - डोळा केला, की परिणाम कमी झालाच समजा. कवी पी. सावळाराम यांनी 'गंगा जमुना डोळ्यात उभ्या का?' असं म्हटलंय तेच 'गंगा जमुना नयनात उभ्या का?' म्हणून त्यात आईच्या मायेचा ओलावा आला असता का? लेखनाकडे गंभीरपणे बघणाऱ्या तरुण मुला-मुलींना, थोडं जागरूक झालं तर शब्दसृष्टीची अनेक रहस्यं कळतील.

'सौभाग्य' चित्रपटाची कथा पुरुषोत्तम भास्कर भावे यांची; तर संवाद ग. दि. माडगूळकर यांचे. माडगूळकर यांनी नायिकेच्या तोंडी वाक्य लिहिलं - ती नायकाला म्हणते - 'माझं तुझ्यावर प्रेम आहे'. भावे यांनी तीव्र हरकत घेतली - माझी नायिका असं म्हणणार नाही. ती म्हणेल - 'माझी तुझ्यावर प्रीती आहे.' 'प्रेम आणि प्रीती - यानं काय फरक पडणार आहे?' माडगूळकरांनी विचारलं. 'माझ्या कथेतली नायिका शालीन, सलज्ज आहे. 'प्रेम'मधल्या मात्रेनं ओठ अधिक उघडतात. 'प्रीती'तल्या दोन वेलांट्यांनी जुईची कळी मिटलेय, असा मुग्ध भाव व्यक्त होतो.'

■

प्रवीण दवणे, 'सकाळ', ३०-०९-२००४

कवी विनायकांची शब्दशक्ती

द. दि. पुंडे

अलीकडे 'विनायकाची कविता' हे पुस्तक माझ्या पुन्हा एकदा सहज वाचनात आले. खरे तर यापूर्वी विनायकांची कविता १९५८ व १९७२ मध्ये म्हणजे दोनदा अभ्यासली होती. परंतु त्या दोन्ही वाचनांत न जाणवलेल्या एकदोन गोष्टी यावेळच्या सहज वाचनात जाणवल्या.

कवी विनायकांचे एक छोटे चरित्र 'विनायकाची कविता' मध्ये समाविष्ट आहे. त्यात विनायकाची मराठी भाषेवरील उत्कट प्रेमाची गोष्ट पुढील प्रमाणे दिली आहे. :

"भाषाविषय हा त्याचा (म्हणजे कवी विनायकांचा) अत्यंत आवडता असून तो, तो अत्यंत मार्मिकतेने शिकवीत असे. त्यावेळी धुळे हायस्कुलात वांगीकर या उपनावाचे एक शिक्षक होते. हे मराठी शिकवीत असत. त्यांची विनायकावर इतकी बहाल मर्जी असे की, ते आपले अध्यापनाचे काम समयपरत्वे त्याचेकडून करवून घेत असत. मायभाषेवर त्याचे इतके अलोट प्रेम होते की, त्याने आपल्या अभ्यासाच्या खोलीत ही आर्या (गीति) लिहून ठेवली होती. -

वाटे ज्या बाळगणें प्राकृतभाषाभिमान हें पाप
होवो न उंबरा हा चढण्याचा त्याजला कधीं ताप

ही कविता दिसण्यात जरी विशेषशी मोहक नाही तरी पण तीत उत्कटता विशेष असून ती त्याने विद्यार्थीदशेत असताना लिहिली होती हे लक्षात ठेवले पाहिजे." (प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित, संपादक व संग्राहक, 'विनायकाची कविता', चित्रशाळा प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, १९५५, पृ. १९)

भाषाप्रेमाच्या या पार्श्वभूमीवर कवी विनायक यांची कविता पाहिली तर ती बरीच खडबडीत होती आणि संस्कृतप्रचुर बोजड शब्दांचा तिच्यात भरणाही असे. "मातृशोणितें", "मत्सरानलें", "कर्णिकार", "चरिताम्रतरू", "चिंतोष्णजलं", "सुप्ततैलकटाहीं" इत्यादींसारखी अनेक अप्रचलित म्हणता येतील अशी शब्दरूपे कवी विनायकांच्या कवितेत आढळतात आणि अर्थातच त्यांच्या कवितेच्या संदर्भात ही शब्दरूपे 'रसास्वाद- विघ्ने'च ठरतात. विनायकांची रचना कशी खडबडीत असे

हे "हय खाजवितां कृष्णाचें कर काय कधीं विटले!", "बोध खलास न रुचे अहिमुखीं दुग्ध होय गरल", "पुर नलगे जेथें खल नाचे" यांसारख्या त्यांच्या काव्यपंक्ती पाहता कळते. बहुतेक कवी विनायकांचे दगदगीचे, धकाधकींचे आणि व्यस्त असे जे जीवन होते, त्यामुळे त्यांना आपली कविता सुललित करावयास अवसर मिळाला नसावा. अन्यथा विनायकांकडे काव्यविषयक एक चांगली अगदी परिपूर्ण जाणीव होती. भाषेवर त्यांची चांगली पकडदेखील होती. उदा. "मला एका गणिताखेरीज अगणित विषय आवडतात" अशी कोटी विनायक सहज गप्पा मारताना करू शकत. विनायकांच्या काळी काव्यलेखनाची जी रीतीपद्धती होती ती देखील कवी विनायक यांना चांगलीच अवगत होती, हे त्यांची काव्यलेखनाची रीती पाहता जसे ध्यानात येते तसेच कवी चंद्रशेखर यांची त्यांच्या 'तारातरंग' या कवितेतील यतिभंग-दोषाबद्दल विनायकांनी एका खाजगी बैठकीत जी टर उडविली होती त्यावरूनही कळते. 'तारातरंग'मधील पहिलाच श्लोक कवी विनायक खालीलप्रमाणे घोळून घोळून म्हणत. :

माझियां लोचनां । नों पहा । हो पहा ।
श्रीनिशा । देविचा । राष्ट्रविस् । तार हा ।

विनोदाचा व टिंगलटवाळीचा हा भाग सोडला तरी कवितेमध्ये रसानुकूल व सौंदर्यपूर्ण शब्द योजना कशी करावी हे कवी विनायकांना पुरतेपणी माहीत होते, याचा एक चांगला पुरावा त्यांच्या चरित्रात सापडतो. बालकवी आणि विनायक यांची चांगली मैत्री होती. बालकवी आपली कविता बाहेर प्रसिद्ध करण्यापूर्वी विनायकांना दाखवीत असत. एकदा विनायक बालकवींकडे गेले असता बालकवींनी आपली नुकतीच केलेली "कसे हाकारूं? शीडाविण दुर्बल तारू" ही कविता विनायकांना दाखविली. विनायकांनी कविता वाचली आणि पटकन् 'दुर्बल' ह्या शब्दाऐवजी "दुबळे" हा शब्द घालून कविता बालकवींच्या हाती परत दिली.

आज बालकवींची ही कविता आपल्यासमोर आहे ती कवी विनायकांच्या या छोट्याशा परिष्करणासह. शब्दार्थाच्या प्रसरणशीलतेची एक चांगली समज कवी विनायकांकडे होती हे बालकवींच्या कवितेत त्यांनी केलेल्या छोट्या पण अर्थपूर्ण परिष्करणावरून कळते.

■

४/९ अर्चना नगर, एरंडवणा, पुणे ३८

मराठी आणि मार्गारेट

विजया देव

"अँड्र्यू आता नुकतीच मराठीची मुळाक्षरं शिकायला लागलाय आणि मला तर असं दिसतंय की इंग्रजीपेक्षा त्याला तीच जास्त आवडत आहेत." हे उद्‌गार आहेत जवळजवळ पावणे दोनशे वर्षांपूर्वी इथे आलेल्या एका युरोपियन मातेचे. ही युरोपियन स्त्री म्हणजे मार्गारेट विल्सन. रेव्हरंड जॉन विल्सन आणि मार्गारेट या नवविवाहित दांपत्यानं मुंबईत पाऊल ठेवलं १८२९ मध्ये. (गिरगाव चौपाटीवरचे विल्सन कॉलेज याच जॉन विल्सनने सुरू केले) स्कॉटिश मिशनतर्फे ही मंडळी धर्मप्रसारासाठी इथे येऊन दाखल झाली आणि मुंबई त्यांची कर्मभूमी ठरली. परक्या भूमीतील लोकांच्या पोटात शिरायचा रामबाण मार्ग म्हणजे त्यांच्याच भाषेत त्यांच्याशी बोलणं. म्हणून मराठी भाषा शिकायला हे दांपत्य लगेच मुंबई, बाणकोट मार्गे हर्णेला दाखल झालं. तिथे ब्राह्मण पंडिताकडून ते मराठीचे धडे घेऊ लागले. ६-७ महिने ते नेटाने मराठी शिकत होते. मार्गारेट विल्सनने खरोखरच मराठी शिकण्यात चांगली प्रगती केली. मराठी भाषेवर प्रभुत्त्व मिळवणारी ही पहिलीच युरोपियन स्त्री असावी.

मार्गारेटनी मराठी शिकायला सुरुवात केली १८२९मध्ये. तेव्हा शास्त्री-मुखातून मराठी शिकण्याखेरीज भाषाशिक्षणाच्या सोयी उपलब्ध नव्हत्या. भाषेचा तात्त्विक विचार करून तयार केलेलं व्याकरण नव्हतं, शब्दकोश नव्हते. पण तरीही जिद्दीनं त्या मराठी शिकल्या. मेजर कँडी, मोल्सवर्थ हे त्यांचे समकालीन. मोल्सवर्थचं मराठीचा शब्दकोश तयार करण्याचं काम तेव्हा चालू होतं. मराठीच्या जोडीला मार्गारेटनी हिंदी भाषाही शिकून घेतली. फ्रेंच भाषेवर तर त्यांचं प्रभुत्त्व होतंच.

भाषासंपादनानंतर हे जोडपं पुन्हा मुंबईला दाखल झालं. मार्गारेटनं स्त्री शिक्षणासाठी संस्था काढल्या, त्यातली 'सेंट कोलंबा स्कूल' ही नामवंत शाळा. लवकरच मार्गारेटला मुलगा झाला. त्याचं नाव अँड्र्यू. आपल्या मैत्रिणीला लिहिलेल्या एका पत्रात मार्गारेट म्हणते, "माझा वेळ सध्या मराठीचा अभ्यास आणि बाळाची तैनात यात कसा जातो तेच कळत नाही." परिणामतः लहानग्या अँड्र्यूला मराठीची गोडी लागावी यात नवल ते कुठलं?

स्त्रियांच्या शिक्षणासाठी धडपड, सहा शाळांची देखरेख, स्थानिकांशी

अनुक्रमणिका

मराठीतूनच संवाद साधणं, मराठीबरोबरच 'हिंदुस्थानी' भाषेवर प्रभुत्व मिळवणं आणि संसार या कार्यप्रपंचात गुंतलेल्या मार्गारेट विल्सनना दुर्दैवानं फार लवकर आजारानं गाठलं आणि १८३५ मध्ये, मुंबईत पाऊल ठेवल्यापासून अवघ्या सहा वर्षांनी त्यांचं देहावसान झालं. तेव्हा त्यांचं वय चाळीस वर्षांचं होतं.

या मार्गारेट विल्सन यांची स्मृतिशिला ग्रांटरोडच्या सेंट कोलंबा स्कूलच्या आवारात जतन केलेली आहे. या पांढऱ्याशुभ्र संगमरवरी शिलेवर त्यांना आपली देशी भाषा येत असल्याचा उल्लेख आहे. भर गर्दीच्या, मध्यवर्ती भागातल्या एका निवांत गल्लीतील ही मुलींची शाळा. या शाळेच्या प्रांगणात, हिरव्यागार हिरवळीच्या चौकोनाच्या एका कोपऱ्यात, हिरव्या झाडावेलींच्या गर्द सावलीत ही शुभ्र शिला खरोखरच मराठीच्या आश्रयाला येऊन विसावलेली आहे.

आज ही स्मृतिशिला इथे दिसत असली तरी तिचाही इतिहास जाणून घेण्यासारखा आहे. मरीन लाईन्सजवळ असलेल्या स्कॉटिश दफनभूमीत मार्गारेट विल्सन यांनी चिरविश्रांती घेतली. ही स्मारकपट्टिका त्यानंतर जवळजवळ दीडशे वर्षे त्याच ठिकाणी होती पण जून १९८० मध्ये मुंबई महापालिकेनं ही दफनभूमी ताब्यात घेतल्यावर ही स्मारकशिला नोव्हेंबर १९८० मध्ये सध्याच्या ठिकाणी हलविण्यात आली. ज्या शाळेची स्थापना आपण केली त्याच वास्तूच्या आवारात आपण विसावणं मार्गारेटना खरोखरच आवडलं असेल.

मार्गारेट विल्सन, म्हणजेच पूर्वाश्रमीच्या मार्गारेट बेन, यांनी मुंबईच्या भूमीवर प्रथम पाऊल ठेवलं ते आपल्या वयाच्या ३४व्या वर्षी आणि दुर्दैवानं पुढे सहा वर्षेच त्या जगल्या. पण अल्पावधीत त्या इथे इतक्या रममाण झाल्या की पुन्हा परत जायची त्यांना इच्छा नव्हती. "आपल्याला इथे आल्याचा मुळीच पश्चात्ताप होत नाही. उलट, मला मायदेशी परतायची अनुमती मिळाली तरी मी येणार नाही... तुम्ही सर्व माझे सुहृद तिथे असला तरी. इतक्या आनंदात मी कधीच नव्हते..." असं त्या एका खाजगी पत्रात म्हणतात.

मार्गारेट व विल्सन यांची ख्रिश्चन धर्मावर अविचल श्रद्धा होती आणि धर्म-प्रसाराचं कार्य हा त्यांचा जीवनमार्ग होता. पण इथल्या माणसांवर आणि भाषेवर मार्गारेटनं जे प्रेम केलं ते बिनतोड होतं. मृत्युशय्येवरच्या मार्गारेटच्या अखेरच्या बोलण्यातलं वाक्यही मराठी होतं. त्यातून तिच्या धर्मनिष्ठतेबरोबरच भाषेशीही आंतरिक जवळीक दिसून येते. ते वाक्य असं आहे : "येशुख्रिस्तावर फार प्रीती ठेवा." ■

"सुप्रिया", ६१/१४ एरंडवणे, प्रभात रस्ता, १४वी गल्ली, पुणे ४११००४

'देव' आणि 'डेव्हिल'

शैलेश सदाशिव पुंडलिक

भाषा आणि जीवनच्या उन्हाळा २००४ या अंकामध्ये प्रा. धडफळे यांनी डॉ. विजया तेलंग यांच्या 'समचरण' या ग्रंथाचा आढावा घेत त्याचे परीक्षण केलेले आहे.

स्वतः प्रा. धडफळे संस्कृत तसेच कन्नड या भाषांचे तज्ज्ञ असल्याने त्यांच्या वेगवेगळ्या सापेक्ष निरीक्षणांना बरेच महत्त्व येत असते. त्यांच्या सूक्ष्म आणि मर्मग्राही निरीक्षणांमधून वाचकाला नेहमीच भाषेचे काही नवेनवे असे पैलू दिसून येतात. त्यामुळे सर्वसाधारणपणे कोणीही वाचक त्यांच्या परीक्षणातील विधानांशी सहजपणे सहमत होतो यात आश्चर्य नाही. तथापि त्यांच्या परीक्षणातील काही विधानांसंबंधी काही महत्त्वाच्या गोष्टी इथे नमूद करणेही अत्यंत आवश्यक आहे. उदा. 'सडा' म्हणजे छटा किंवा पावसाची सर हे मान्य करायला अवघड नाही. तथापि संन्याशाची 'छाटी' प्रमदेची 'साडी' कशी होते हे समजणे अवघड आहे त्यासाठी हे दोन शब्द ज्या मूळ शब्दापासून व्युत्पन्न झालेले आहेत त्याचे निर्देशन प्रा. धडफळे यांनी केले असते तर ते फार बरे झाले असते.

आता 'देव', 'डेव्हिल' या शब्दांचा विचार करू या. फार विरोधी अर्थाने शब्द आणि प्रतिमा रूढ होऊ शकतात आणि त्याची अनेक उदाहरणेही सापडतात हे खरे आहे. पण बग = भूत आणि बोग = देव, भग = भाग्य इत्यादी शब्द √भज् = विभाग करणे या क्रियापदापासून व्युत्पन्न झाले आहेत हे सिद्ध करणे अवघड वाटते. विशेषतः भिक्षु हा शब्द तर नक्कीच भक्ष्य, √भुञ्ज = खाणे या क्रियापदाशी संबंधित असला पाहिजे.

माझ्या मते मूळ युरोभारतीय भाषेत √BHEG असे रूप होते. त्याचा अर्थ पूजा करणे, उपासना करणे असा असला पाहिजे. त्यापासून भग, भगवान, बग, बोग, बागुल (आणि कदाचित भोज) हे शब्द तयार झाले असावेत. पण √भज् = विभाग करणे या क्रियापदाबरोबरच √भुञ्ज = खाणे, √भज् = भजन, भक्ती

अनुक्रमणिका

करणे अशी इतरही काही क्रियापदे प्राचीन युरोभारतीय भाषेमध्ये वापरली जात असल्याने भगवान, भिक्षु यासारखे शब्द नेमके कोणत्या क्रियापदाशी संबंधित आहेत हे ठरवणे अवघड होते.

त्यातही महत्त्वाचे म्हणजे आर्यांचा 'देव' अवेस्तामध्ये 'दएव' म्हणजे राक्षस या अर्थाने वापरला जातो कारण भारतीय आर्य हे इंद्राचे तर इराणी आर्य हे वरुण आणि अग्नीचे उपासक होते. त्यांच्यामध्ये कालांतराने वितुष्ट आल्यावर इराण्यांनी देव शब्द राक्षस या अर्थाने वापरणे नैसर्गिक होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीयांनीही इराण्यांचा असुर = ईश्वर हा शब्द राक्षस या अर्थाने वापरायला सुरुवात केली हा त्यांच्या भाऊबंदकीचा परिपाक होता हे स्पष्ट आहे.

हाच देव शब्द इंग्रजीमध्ये डिव्हाइन (divine) या स्वरूपात दिसतो याचे कारण ते दोन्हीही द्यु म्हणजे आकाश या शब्दाशी साधर्म्यसंबंधी ('cognate') आहेत. त्याच शब्दापासून ज्यूपिटर म्हणजे आकाशस्थ पिता किंवा आकाशरूपाने वावरणारा पिता हा शब्दही तयार होतो. त्याचे संस्कृत रूप 'मधु द्यौरस्तु नः पिता' या विधानात दिसून येते. ग्रीक पुराणातील झ्यूस (Zeus) या देवांच्या राजाशीही त्याचे साम्य आहे हे आता सर्व तज्ज्ञ मान्य करतात. हा 'डिव्हाइन' शब्द इतरही भाषांत दिसतो. उदा. फ्रेंच devinement या शब्दात तर यातील ए हा स्वर सुद्धा जसाच्या तसा पहायला मिळतो.

मात्र देव हा शब्द डेव्हिल या शब्दातही दिसतो असे म्हणता येत नाही. इराण्यांच्या ऐतिहासिक परंपरेमध्ये देव हा शब्द राक्षस या अर्थाने वापरायला सुरुवात झाली ती इ.स.पूर्व ७००च्या सुमारास म्हणजे ज्यावेळी युरोपातील आर्य आणि आशियातील आर्य यांची फारकत झाली त्यानंतर सुमारे एक हजार वर्षांनंतर. त्यामुळे युरोपातील आर्यांना देव हा शब्द वाईट अर्थाने वापरण्याचे कारण नव्हते. किंबहुना देव हा शब्द थिओ (theo) या स्वरूपात थिऑलजि, थिऑसफी, थिऑक्रसी इत्यादी शब्दांमध्ये वापरलेला दिसतो.

इतिहासाचाच दुसरा पैलू म्हणजे डेव्हिल या शब्दाची मूळ संकल्पना ही सेमेटिक वंशाची आहे. रोम आणि ग्रीस या देशांत ख्रिश्चन धर्म सार्वत्रिक रीतीने पसरला तो इ.सनाच्या पाचव्या शतकानंतर, म्हणजे देव सारख्या संकल्पना वापरात आल्यानंतर सुमारे एक हजार ते पंधराशे वर्षांनंतर. याचाच अर्थ असा की या दोन भिन्न संकल्पना एकत्र केल्यास त्यात कालविपर्यासाचा दोष निर्माण होईल.

पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे असे की सेमेटिक संकल्पनेतील सैतानाचा प्रमुख

गुणधर्म खोटे बोलणे हा आहे. म्हणून त्याला the father of big lies असे म्हणतात. त्यामुळे अशा सैतानाचा तिरस्कार करणाऱ्या ख्रिश्चन धर्मात खोटेपणा हा अक्षम्य अपराध मानला जातो. सैतानाच्या या खोटेपणाचे वर्णन लॅटिनमध्ये diable (dia ला समांतर असणारा मराठी शब्द 'द्वि' आणि ble ला समांतर असणारा मराठी शब्द तर सरळसरळ 'बोल' असा आहे) म्हणजे दुहेरी बोलणारा असे केले जाते. सुदैवाने आजही फ्रेंचमध्ये सैतानासाठी तोच शब्द उपलब्ध आहे. देव शब्दापासून नव्हे तर diable या शब्दापासूनच डेव्हिल हा शब्द व्युत्पन्न होतो असे म्हणणे जास्त सयुक्तिक आहे. आणि अगदी देव या शब्दापासून डेव्हिल हा शब्द तयार होतो असा निर्विवाद पुरावा जरी उपलब्ध होत असेल तरी असा पुरावा आणि असे निष्कर्ष मांडणे धोक्याचे असते, कारण अशा विधानांचा राजकीय स्वार्थासाठी वापर केला जाऊ शकतो याचा अनुभव यापूर्वी आलेलाच आहे. तेव्हा या प्रकारची विधाने गंभीर लेखनामध्ये न करणे हे योग्य ठरेल. ■

उपयोजित भाषाविज्ञान विभाग, श्री. ना. दा. टाकरसी महिला विद्यापीट, मुंबई - ४०००२२

प्रतिक्रिया - २

मराठी व्याकरणाच्या अभ्यासाची दिशा

प्रकाश परब

'भाषा आणि जीवन'च्या हिवाळा २००४च्या अंकात 'पुस्तक-परीक्षण' या सदरांतर्गत 'मराठी व्याकरणाचा अभ्यास' ह्या माझ्या पुस्तकावरील लीला गोविलकर यांची प्रतिक्रिया वाचली. वास्तविक कोणत्याही लेखकाने आपल्या पुस्तकावरील प्रतिक्रिया कितीही प्रतिकूल असली तरी तिचा प्रतिवाद करू नये या मताचा मी आहे. पण दुसऱ्या बाजूने असाही विचार मनात आला की, आपले हे मौन ज्यांच्यासाठी पुस्तक लिहिले त्या विद्यार्थ्यांच्या बुद्धिभेदाला अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरू शकेल. तसेच गोविलकरांनी शोधून काढलेल्या तथाकथित त्रुटी आणि दाखवलेल्या प्रस्तुत लेखकांचा 'अप्रामाणिकपणा' यांनाही मान्यता दिल्यासारखे होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे असला खोडसाळपणा परीक्षणाच्या नावाखाली खपून जाऊ शकतो असाही

त्यातून चुकीचा संकेत जाईल. त्यामुळ निषेध नोंदवण्यासाठी का होईना मौन सोडावे लागत आहे.

माझ्या पुस्तकाच्या मलपृष्ठावरील मजकुरावरून कोणाच्याही सहज लक्षात येईल की, हे पुस्तक मराठी व्याकरणातील संशोधन नसून ते मराठी व्याकरणाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन लिहिलेले एक शैक्षणिक पुस्तक आहे. शैक्षणिक पुस्तक म्हटले की संबंधित विषयाचे अभ्यासक्रम, पुस्तकनिर्मिती व वितरण यासंबंधीचे प्रकाशकीय धोरण आदी घटक दुर्लक्षिता येत नाहीत. अशा पुस्तकाची पृष्ठसंख्या, पुस्तकात काय यायला हवे, काय नको यावर एकट्या लेखकाचे नियंत्रण असत नाही हे शैक्षणिक पुस्तकांच्या क्षेत्रात वावरणाऱ्यांना सांगायला नको. परंतु गोविलकरांनी हेतुपुरस्सर या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून 'म.व्या.अ.' हे संशोधनपर पुस्तक आहे असा पवित्रा घेऊन म्हणजे दोरीला साप समजून तिला धोपटण्याचा प्रकार केला आहे.

गोविलकर यांनी मूलध्वनी आणि वर्णसंकल्पना, ऐ - औ यांचे वर्णत्व, शब्द - प्रत्यय यांच्यातील भेद, पदसंकल्पना, शक्य - प्रयोजक भेद, संयुक्त क्रियापदाचा वाद, विभक्तीसंबंधीची प्रत्ययवादी भूमिका आदि विषयांबाबत उपस्थित केलेल्या शंकांना सविस्तर उत्तर द्यावे असा आधी विचार केला होता. पण "कदाचित या शंकांची उत्तरे ते ज्यांच्या आधारावर ही मते मांडत आहेत त्यांच्या ग्रंथात असतीलही ...." हे वाचल्यावर तो विचार सोडून द्यावा लागत आहे. गोविलकरांची मल्लिनाथी पाहता मराठी व्याकरणातील विवाद्य स्थळांवर पूर्वग्रह सोडून, वस्तुनिष्ठपणे चर्चा व्हावी अशी त्यांची इच्छा आहे, असे वाटत नाही.

पारिभाषिक संज्ञांची सूची दिली तर ती अपुरी कशी आहे हे त्यांनी सांगितले आहे. दुसरीकडे अशा सूचीची अनावश्यकताही त्या सूचित करतात. काय तर म्हणे, "पारिभाषिक संज्ञा वाचत व्याकरण समजून घेणे म्हणजे कोशातील शब्दार्थ पाहत कादंबरीचा आस्वाद घेणे होय". शास्त्रीय विषयाचे अध्ययन व कादंबरीचा आस्वाद यांचा संबंध काय? तर मग ही सूची अपुरी आहे हे दाखविण्यासाठी आणखी काही संज्ञा सुचविण्याचा उद्योग कशासाठी? बरे, संज्ञासूची दिलीच नसती तर विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या पुस्तकाला साधी संज्ञासूची नाही म्हणून लेखकाला झोडपायला 'त्या' मोकळ्या!

■

१६, निलयन, जुनी डोंबिवली, रिक्षा स्टँड जवळ, डोंबिवली (प.) - ४२१ २०२

आठवी सर्वसाधारण सभा

विजया चौधरी

मराठी अभ्यास परिषदेची आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७-६-२००४ ला पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळाच्या राजवाडे सभागृहात संध्याकाही ठीक ५ वा. डॉ. अशोक केळकर यांच्या अध्यक्षतेखाली अयोजित करण्यात आली होती. पुरेशा गणसंख्येअभावी सभा १५ मिनिटे स्थगित करून ठीक ५ वा. १५ मिनिटांनी सभेचे कामकाज त्याच ठिकाणी सुरू करण्यात आले.

सर्वप्रथम, गतवर्षी दिवंगत झालेले परिषदेचे आजीव सदस्य डॉ. सुरेश नाडकर्णी (मुंबई) व डॉ. ह. श्री. शेणोलीकर तसेच भाषातज्ज्ञ डॉ. अ. मा. घाटगे, विश्वनाथ नरवणे, डॉ. रा. सो. सराफ, प्रा. भा. म. गोरे व प्रा. वसंत दावतर यांना एक मिनिट स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यवाह डॉ. नीलिमा गुंडी यांनी मागील वर्षीच्या दुसऱ्या विशेषसाधारण सभेचे तसेच सातव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर केले. त्याला एका ठरावाद्वारे मान्यता देण्यात आली. या ठरावाला श्री. किसन होळकर हे सूचक व श्रीमती नीलिमा म्हैसूर या अनुमोदक होत्या.

त्यानंतर कार्यवाहांनी गतवर्षीचे कार्यवृत्त सादर केले. गेल्या वर्षभरातील महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये २१-१२-०३ रोजी आयोजित करण्यात आलेला "मराठीच्या विकासाच्या दिशा" या विषयावरील परिसंवाद आणि महाबँक भाषा विषयक लेखन - पुरस्कार वितरण समारंभ यांचा समावेश होता. परिषदेच्या "भाषा आणि जीवन" या पत्रिकेने २२व्या वर्षात पदार्पण केले असून गतवर्षी वार्षिक वर्गणीदार १५२, संस्थावर्गणीदार ८८ तसेच संस्थेच्या आजीव सभासदांची संख्या २७२ असून परदेशस्थ सदस्य १५ असल्याची माहिती सभागृहाला देण्यात आली. हे कार्यवृत्त मंजूर करण्याविषयीच्या ठरावाची सूचना श्रीमती शकुंतला क्षीरसागर यांनी केली व श्रीमती मालती हळबे यांनी त्यास अनुमोदन दिले.

कोषाध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी २००३-२००४ या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षकांनी मंजूर केलेला ताळेबंद सादर केला. ताळेबंदाचे संपूर्ण मराठीकरण करण्याचा परिषदेचा प्रयत्न राहील असे कोषाध्यक्षांनी आवर्जून सांगितले. त्यानंतर कोषाध्यक्षांनी २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला. ताळेबंद व अर्थसंकल्प या दोन्हींना मान्यता देणारा ठराव मांडण्यात आला. या ठरावाचे सूचक श्री. मो. गो. धडफळे आणि अनुमोदक श्रीमती सुप्रिया सहस्रबुद्धे हे होते. येत्या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षक श्री. ए. जे. दिघे यांना मान्यता देणारा तसेच कायदेविषयक सल्लागार म्हणून ॲड. पराग देशपांडे यांची नेमणूक करणारा ठराव संमत करण्यात आला. या ठरावाची सूचना प्रा. ल. ना. गोखले यांनी केली. व प्रा. प्र. ना. परांजपे यांनी त्यास अनुमोदन दिले.

मार्च २००४च्या शालांत परीक्षेत मराठी विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण चिंताजनक असल्यामुळे अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळचा विषय म्हणून यासंबंधी चर्चा करण्यात आली. अध्यक्ष डॉ. अशोक केळकर यांनी अनुत्तीर्णांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी परिषदेने प्रयत्न करावे असे सुचवून काही मुद्दे मांडले. गेल्या वर्षीच्या सभेतील सूचनेप्रमाणे मराठी विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्वस्पर्धा, निबंधलेखन व वाचन स्पर्धा घेणे आणि शिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सहकार्याने प्रशिक्षण वर्ग घेणे या सूचनांचा त्यात समावेश होता. या विषयावरील चर्चेत श्रीमती मालती हळबे, प्रा. प्र. ना. परांजपे, श्री. किसन होळकर, श्रीमती सुप्रिया सहस्रबुद्धे व श्रीमती नीलिमा म्हैसूर यांचा सहभाग होता.

मालती हळबे यांनी मराठीचे व्याकरण तर्कसुसंगत नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ उडतो असे सांगितले. प्रा. परांजपे यांनी ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षांचे आयोजन करून त्याद्वारे १०वीचा अभ्यास पूर्ण करून घेण्याची सूचना मांडली. तसेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून शाळाशाळांमधून निघणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट हस्तलिखित अंकांना पारितोषिके देण्यात यावीत असेही मत मांडले.

श्री. किसन होळकर यांनी मराठीविषयी विद्यार्थ्यांना वाटणारा फाजील आत्मविश्वास व विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनावर झालेले इंग्रजीचे अतिक्रमण या विषयी चिंता व्यक्त केली व यावर उपाय म्हणून पालकांची मदत घेण्याची गरज व्यक्त केली. सुप्रिया सहस्रबुद्धे यांनी कार्यवाहीसाठी माध्यमिक शाळा, महानगरपालिकेच्या

शाळा, मुख्याध्यापक संघ तसेच पालक-शिक्षक संघ यांची मदत घेता येईल असे सुचविले. श्रीमती नीलिमा म्हैसूर यांनी शाळा व मराठी अभ्यास परिषद यांच्यात सुसंवाद निर्माण करण्यावर भर दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. नीलिमा गुंडी यांनी आभार मानले.

■

इ-५०३, गार्डन व्ह्यू, पर्वती नगर, सिंहगड रोड, पुणे -४११०३०

लोकांचे शतक

वस्तुतः 'वर्तमानकाळ' असा नसतोच, कारण वर्तमानातील प्रत्येक क्षण, सतत 'इतिहासजमा' होत असतो. येणारा क्षण भविष्यकाळातला आणि गेलेला क्षण इतिहासातला. वर्तमान क्षणाला फुरसतच नाही! इतिहासाचा अभ्यास म्हणजे या अखंड जीवनप्रवाहाचा मागोवा.

विसाव्या शतकाचा इतिहास लोकांनी घडविला असे म्हटले जाते, कारण हा इतिहास केवळ राजे-रजवाड्यांच्यातील सत्तासंघर्षांचा नाही, त्यांच्यातील युद्धांचा नाही, घराण्यांमधील सत्तास्पर्धांचा नाही. विसाव्या शतकात फक्त सैन्य लढले नाही, तर सर्व वर्गातील - भांडवलदार, कामगार, शेतकरी - लोक प्रत्यक्ष संघर्षांमध्ये उतरले. कधी फॅशिझमचा पराभव करण्यासाठी, कधी प्रस्थापित राजेशाही उधळून लोकशाही स्थापन करण्यासाठी, कधी कम्युनिस्ट हुकुमशाही राजवट नेस्तनाबूत करण्यासाठी, कधी सामाजिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, कधी क्रांतीसाठी, कधी न्यायासाठी, कधी साम्राज्यवाद पराभूत करण्यासाठी, कधी वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी, कधी नव - साम्राज्यशाहीच्या आक्रमणाच्या विरोधात तर कधी राष्ट्रीय अस्मितेसाठी!

याच शतकात हिरोशिमा - नागासकीवर पहिले अणुबॉंब टाकले गेले आणि नंतर अण्वस्त्रांची हिंस्त्र स्पर्धा सुरू झाली.

जगाच्या इतिहासातील सर्वात चित्तथरारक आणि तेजस्वी इतिहास विसाव्या शतकाचा आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा उदय व पीछेहाट, फॅशिझमचा उदय व ऱ्हास, साम्राज्यवादाचा विस्तार आणि पराभव, नववसाहतवादाची दादागिरी आणि त्याचा पाडाव असे अनेक महासंघर्ष या शतकात घडले. त्या संघर्षांचा नायक कोण, असे विचारले तर याचे उत्तर 'लोक' असेच द्यावे लागेल.

■

कुमार केतकर, 'लोकसत्ता', ११.०७.२००४

अनुक्रमणिका

पत्रिका-सूची

भाषा आणि जीवन : वर्ष २२ : २००४ची लेखनसूची

अभिषेक दिलीप लोखंडे

लेखकसूची

-/परिषद वार्ता / मराठी अभ्यास परिषदेच्या कार्यकारी मंडळाची पंचवार्षिक निवडणूक / २२.२, उन्हाळा / ४०

अर्जुनवाडकर, कृष्ण श्री. / महाभारतात मराठी / २२.४, दिवाळी / ४२

इनामदार, हे. वि. / हरीभाऊ आपटे यांचा साहित्यविचार आणि भाषाविचार / २२.३, पावसाळा / १८

इंगोले, प्रतिमा / विदर्भ बोली / २२.१, हिवाळा / १२

कदम, महेंद्र सुदाम / बालकांचे भाषासंपादन : काही निरीक्षणे / ज्याची त्याची प्रचिती / २२.२, उन्हाळा / ४९

कुलकर्णी, निर्मला / 'उरणे' या क्रियापदाची व्युत्पत्ती / शंका - समाधान / २२.२, उन्हाळा / ५२

केतकर, गीता / संस्कृत भाषेतील 'संख्यावाचके' / २२.३, पावसाळा / ३५

कोल्हटकर, माधवी / ही कोण भवानी ? / २२.४, दिवाळी / ४६

कोस्त, दिदेर / साहित्यप्रकारांचे प्रयोजन / परीक्षणलेख / अनुवादक : जयंत धुपकर / परीक्षित पुस्तक : 'इस्थेटिक्स ऑफ लिटररी क्लासिफिकेशन' - डॉ. मिलिंद मालशे / २२.४, दिवाळी / ७

गर्दे, पु. कृ. / विश्वसूची / २२.२, उन्हाळा / १७

गोविलकर, लीला / मराठी व्याकरणाच्या अभ्यासाची दिशा / पुस्तक परीक्षण (परीक्षित पुस्तक : 'मराठी व्याकरणाचा अभ्यास' लेखक : डॉ. प्रकाश परब) / २२.१, हिवाळा / ४९

गोसावी, कुमुद / भारुडांतील भाषावैभव / २२.२, उन्हाळा / २१

गुंडी, नीलिमा / नवतरुणांची भाषा / संपादकीय / २२.१, हिवाळा / १

चौधरी, विजया / परीषद वार्ता / आठवी सर्वसाधारण सभा / २२.४, दिवाळी /

जोशी, भालचंद्र श्रीपाद / हरिश्चंद्र बोरकर यांच्या लेखावरील प्रतिक्रिया / २२.२, उन्हाळा / ३८

डहाके, वसंत आबाजी / मुखपृष्ठ / २२.१, हिवाळा / २२.२, उन्हाळा / २२.३, पावसाळा / २२.४ दिवाळी.

देव, विजया / टाळ्यांची बोलकी भाषा / ज्याची त्याची प्रचिती / २२.३, पावसाळा / ३२

लेख सूची

पानपूरके :

■

सी. ११ जावळे कॉम्प्लेक्स, वडगाव शेरी, पुणे - १४

खऱ्या शिष्याचे खरे प्रत्युत्तर

नामदार गोखल्यांनी गांधींना एका पत्रात लिहिले आहे - 'तुमची आताची पावले फारच चुकीची आहेत, असे माझे मत पुन्हा एकदा मांडतो. व्हाइसरॉयच्या इच्छेला मान देण्याची तुम्हांला पुनश्च विनंती केली आणि तुम्ही जर याविरुद्ध गेलात, तर परिस्थिती तुमच्याविरुद्ध जाईल. ते योग्य होणार नाही.' गांधींनी त्याच दिवशी त्यांना उत्तर लिहिलेले आहे. 'तुमची भावना मला समजतेय. परिस्थितीत फरक पडला, तर प्राणही द्यायला माझी तयारी आहे.' या ठिकाणी गांधींनी गोखल्यांना सरळच सांगितले आहे - 'तुमच्याबद्दल आदर आहे, प्रेम आहे. माझा जो लढा आहे, तो तुम्ही ज्याला स्पिरिच्युअलायझिंग पॉलिटिक्स म्हणता त्यासाठी आहे. माझा खऱ्या अर्थाने आध्यात्मिक लढा आहे.' इथे गांधीजींनी त्यांच्या गुरुंना स्पष्ट उत्तर दिलेले आहे. थोडेसे विषयांतर होईल; पण मला एक गोष्ट आठवली की गांधीजींना असे उत्तर फक्त साने गुरुजींनीच दिलेले आहे. त्यावेळी साने गुरुजी विठ्ठल मंदिरात दलितांना मुक्त प्रवेश मिळावा यासाठी पंढरपूरला उपोषण करीत होते. गांधीजींच्या भोवताली असणाऱ्या काही नतद्रष्ट लोकांनी त्यांचे कान भरले, त्यांना चुकीची माहिती दिली. त्यामुळे गांधीजींनी साने गुरुजींना तार केली की तुम्ही कृपा करून उपोषण ताबडतोब मागे घ्या. तेव्हा साने गुरुजींनी त्यांना लिहिलेले पत्र आणि गांधींनी गोखल्यांना लिहिलेले पत्र यांमध्ये विलक्षण साम्य आहे. साने गुरुजींनी गांधीजींना लिहिले, 'मी आपल्याला गुरुस्थानी मानतो. मी आपली अवज्ञा आतापर्यंत कधीही केलेली नाही; पण यावेळी आपल्याला पूर्णपणाने सत्य समजले, तर माझी भूमिकाही आपण मान्य कराल, मला उपास करायला संमती द्याल, असा मला पूर्ण विश्वास वाटतो.' मोठ्या माणसांनादेखील जे त्यांचे खरे अनुयायी असतात, ते कशा तऱ्हेचे उत्तर देतात, हे येथे आपल्याला कळते.

[संदर्भ : ग. प्र. प्रधान, 'म. गांधी, ना. गोखले, लो. टिळक : भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील त्रिवेणी संगम', फिरोदिया व्याख्यान, एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशन पुणे २४:०२:२००३]


आणखी एक उदाहरण पण थोडे निराळ्या प्रकारचे : प्राचीन ग्रीसमधील थोर तत्त्ववेत्ते ॲरिस्टॉटल यांचे प्लेटो हे दुसरे तत्त्ववेत्ते गुरु. आपल्या गुरुशी एका बाबतीत स्पष्ट मतभेद नोंदताना ॲरिस्टॉटल म्हणतात : प्लेटो हे मला प्रिय आहेत खरे, पण सत्य हे मला अधिक प्रिय आहे.

■

प्रेषक : अशोक रा. केळकर, पुणे.

अनुक्रमणिका

R.N.I. नोंदणी क्रमांक : ०-४००४८/८३
बुकपोष्ट - बुकपॅकेट - त्रैमासिक
या अंकाची किंमत रु. २५/-.



प्रति

प्रे.

कार्यवाह, मराठी अभ्यास परिषद
३, अन्नपूर्णा, १२५९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ५, वाडिया हॉस्पिटलसमोर,
पुणे ४११ ००२. (दू. क्र. २४४८६०१५)

अनुक्रमणिका